# चंद्रलोकीचा चंदर

कुमुदिनी रांगणेकर

BVBK-0401588

राजा प्रकाशन

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय
दा. क्र. १५८८



BVBK-0-01588

कुमुदिनी रांगणे

# चंद्रलोकीचा चंदर

कुमुदिनी रांगणेकर

BVBK-0401588

राजा प्रकाशन

प्रकाशक

सौ. शुभदा मुळे
राजा प्रकाशन
सी/८ इंद्रवदन सोसायटी
पद्मावाई टक्कर रोड
माहीम, मुंबई ४०००१६

© कुमुदिनी रांगणेकर

प्रकाशन क्रमांक ४१

प्रथमावृत्ती
३१ ऑगस्ट १९८२

मूल्य १० रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१।४ सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ४११०३०

माझी नात चि. नूपुरी
हिला
' चंद्रलोकीचा चंदर '
ही कादंबरिका सप्रेम भेट

— आजी

बालमित्रांनो,

तुम्हाला गोष्टी आवडतात ना? मग अनेक गोष्टींची पुस्तके राजा प्रकाशनतर्फे प्रकाशित करण्याचा विचार आहे. ‘ विक्रमचे ल्व्हबर्डस् ’ या पुस्तकाचे तुम्ही अत्यंत उत्साहाने स्वागत केले. आता त्यानंतर हे दुसरे पुस्तक. हे पुस्तक आता एकटेच तुमच्या भेटीला येत नाही. आपल्याबरोबर लवाजमा घेऊन येत आहे. त्यात ‘ विक्रमवीर चिंटू ’ आहे, ‘ धडपड्या दिलीप ’ आहे. ‘ चिमखडे हेर ’ व ‘ मगरमिठीत रोहित ’ त्यात सामील झाले आहेत. ‘ चंद्रलोकीचा चंदर ’ व ‘ चंद्र सूर्याला चोरतो ’ यांनी त्यात प्रवेश केला आहे. आणि ‘ मांजरीची जादू ’ व ‘ सलांको नगर ’ ही त्यात वाजतगाजत येत आहेत. ही सर्व पुस्तके एकदम एका वेळेला तुमच्या भेटीला येत आहेत. पहिल्या पुस्तकाचे तुम्ही जसे स्वागत कराल तसेच ह्या सर्व पुस्तकांचेही कराल अशी खात्री आहे.

– प्रकाशक

म प्र ग्रं.
का. क्र ९५८ दिनांक
विषय

# एक

आपल्या पृथ्वीसारखाच चंद्रलोक खरोखरीचा आहे हे संशोधकांनी आता सिद्ध केलं आहे!

रशियानं विमानातून लायका नावाच्या कुत्रीला चंद्रलोकात धाडून आणली. पण चंद्रावर मनुष्यवस्ती नाही हे कळून आलं आहे. अगदी तिथं कुत्रंसुद्धा फिरकत नाही अशी स्थिती आहे म्हणे! त्याचमुळं रशियन लायका कुत्री तिथं फिरकून परत आली!

ते काही का असे ना, पण चंद्रावर सगळं आपल्यासारखंच आहे अशी कल्पना करायला कोणती हरकत आहे?

'जे न देखे रवी, ते देखे कवी' असं म्हणतात. मग सूर्याला सुद्धा न दिसणारं जर कवीला दिसू शकतं तर ते लेखकांना— गद्यलेखकांना— का दिसणार नाही?

तेव्हा ऐका त्या चंद्रलोकाविषयीची ही कल्पनेतली कहाणी—

त्या चंद्रलोकात सगळं कसं शांत, थंड असे—चंद्राच्या शीतल चांदण्यासारखं! परस्परांत मारामारी राहिलीच, पण भांडणंसुद्धा नाहीत. फार काय भांडणापेक्षा अबोला बरा म्हणतात, तो सुद्धा नाही!

सगळं खेळीमेळीचं वातावरण! 'तुमचं ते आमचं आणि आमचं ते तुमचं'' ही स्नेहाची भावना!

पण एकदा काय झालं, चंद्रलोकातल्या माणसांना ह्या सौम्य, मवाळ परिस्थितीचा जरा कंटाळा आला. गुणाचा अतिरेक झाला की, त्याला दुर्गुणाची अवकळा येते.

आताशा तिथली माणसं मोठ्यांदा खळखळून हसत सुद्धा नव्हती. उगीच किंचित ओठ विलग करून मंद स्मित करायचं. कारण त्यांचं जीवन कसं अळणी बनलं होतं.

राग, रोष, मत्सर, हेवादावा ह्या भावना तामस असतात! सात्त्विक, राजस आणि तामस हे आपल्या भावनांचे तीन प्रकार आहेत. पण विनोद काही तामस नव्हे. तो सात्त्विक असतो, राजस असतो. आता कधीकधी विनोदाचा अतिरेक झाला तर सात्त्विक किंवा राजस विनोद तामस बनतो, बोचतो तो! "अति तिथे माती" हे खोटं नाही.

ह्याच अर्थाचं एक संस्कृत सुभाषित फार बोलकं आहे!

"अति सर्वत्र वर्जयेत्!" आणि ह्याच्या पहिल्या तीन ओळी अशा आहेत.

> अतिदानात् बलिर्बद्धः ।
> अतिगर्वेण रावणः ॥
> अतिरूपेण वै सीता ।
> अति सर्वत्र वर्जयेत् ॥

देवानं घेतलेले दशावतार ठाऊक आहेत का तुम्हाला? ऐका—
(१) मत्स्य (२) कूर्म (३) वराह (४) नृसिंह (५) वामन (६) राम (७) परशुराम (८) श्रीकृष्ण (९) बुद्ध आणि (१०) कलंकी

तर ह्यातला पाचवा—वामनाचा—अवतार श्रीविष्णूंना घ्यावा लागला. कारण बळी नावाचा राजा फार जुलमी म्हणून जसा कुप्रसिद्ध होता, तसा दानशूर म्हणून सुप्रसिद्ध होता. पण ह्या 'सु' वर 'कु' नं मात केली.

बळी राजाचे अत्याचार वाढू लागले. म्हणून श्रीविष्णूंनी वामनाचा– छोट्या मुलासारखा, बटूसारखा– अवतार घेतला. आणि तो बळीराजाकडं आला नि त्यानं तीन पावलं जमिनीचं दान मागितलं. बळी राजाला हसू आलं. फुस्स ! एवढ्याशा मुलाच्या लहानशा तीन पावलांनी केवढी जमीन व्यापली जाणार ?

बळीनं वामनाला तीन पावलांचं दान दिलं आणि ते पूर्ण करण्यासाठी वामनाच्या हातावर पाणी सोडलं !

ही दानविधी यथासांग करण्याची रीत असते. त्याचमुळं कोणाला काही सर्वस्वी दिलं की त्यावर " पाणी सोडलं " असे म्हणतो आपण.

तर हे दान पाणी सोडल्यावर पूर्ण होताच वामनानं आपलं छोटं बटुरूप टाकून विलक्षण मोठं रूप प्रकट केलं. ते स्वरूप इतकं मोठं होतं की, वामनानं आता आपल्या एका पावलानं सगळा स्वर्ग व्यापला. दुसऱ्या पावलानं सबंध पृथ्वी घेरली.

आणि त्या प्रचंड वामनानं बळीला विचारलं, " बोल, आता तिसरं पाऊल कुठं ठेवू ? "

बळी जुलमी होता, गर्विष्ठ होता तरी तो शब्दाचा सच्चा होता. तो लगेच गुडघे दुमडून बसला आणि त्यानं वामनाला–श्रीविष्णूंना–तिसरं पाऊल आपल्या डोक्यावर ठेवण्यास सांगितलं. त्याप्रमाणं तिसरं पाऊल त्याच्या डोक्यावर ठेवून श्रीविष्णूंनी त्या राक्षसाला खाली पाताळात धाडलं. मात्र दिलेला शब्द पाळण्याच्या त्याच्या निष्ठेबद्दल विष्णूंनी त्याला पाताळाचा राजा केला. बळीनं जर अन्यायाचा आणि दानाचा असे वाईट नि चांगले दोन्ही अतिरेक केले नसते तर त्याचा हा शेवट झाला नसता ! म्हणून कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होता नये !

पण चंद्रलोकात विनोदाला वाव उरला नव्हता. विनोद करणं, विनोद ऐकणं तिथं दुर्मिळ झालं होतं. म्हणजे हळूहळू तिथल्या लोकांची हसण्याची राहिलीच पण किंचित स्मित करण्याची सवयसुद्धा नाहीशी होईल

असं त्यांना भय वाटत होतं. हा नकारात्मक अतिरेकच होता.

हे आता त्यांना पटलं होतं. आणि ‘ अति सर्वत्र वर्जयेत् ’ हे त्यांना ठाऊक असल्यामुळं ही अतिरेकी परिस्थिती बदलण्याची त्यांना निकड भासत होती. त्यासाठी त्यांनी काय केलं ?

आता ऐका तीच गंमत, जंमत.

चंद्रलोकातल्या माणसांनी नाना देशांत चौकशी केली. बिनतारी संदेश धाडून बरं का ! आणि त्यांना कळून आलं की, आशिया खंडामधल्या भारत देशातल्या महाराष्ट्र राज्यात विनोदाचं भरघोस पीक नेहमी येतं. अगदी वर्षभर पाऊस न पडल्यानं ‘ अवर्षण ’ असलं, किंवा अकाली धो, धो पाऊस पडल्यानं ‘ अतिवर्षण ’ ओढवलं तरी गेली कित्येक वर्षं महाराष्ट्रात विनोदाचं पीक नियमित उगवत असतं !

पूर्वी संस्कृत नाटकांतच विदूषकांचे खाण्याच्या पदार्थावरून केलेले खमंग विनोद आढळत असत. पुढं मराठी नाटकांत, काव्यात, गद्यात गुंफलेले विनोदाचे किस्से भरपूर तयार होऊ लागले, अजुनी होत आहेत असं ह्या बिनतारी शोधाअंती चंद्रवासीयांना कळून आलं.

आणि बस्स ! आपल्या चंद्रलोकीच्या बारा, चौदा वर्षांच्या चतुर, चिमुरड्या चंदरला भारतातल्या महाराष्ट्रात पाठविण्याचं त्यांनी ठरविलं. महाराष्ट्रातल्या पुण्यनगरीत म्हणजेच पुणे शहरी चंदरनं जावं असा निर्णय त्यांनी घेतला.

कारण पुण्यातले लेखकच नव्हे, तर लोकसुद्धा विनोदाचे चाहते आहेत असा ‘ रिपोर्ट ’ त्यांना मिळाला होता !

समर्थ रामदास स्वामींनी म्हटलं आहे की, “ टवाळा आवडे विनोद ” ह्या त्यांच्या उद्गारात विनोदाची वेगळी व्याख्या त्यांच्या मनात असावी. साधा, सोज्वळ विनोद नव्हे ! तर एकांगी, कुत्सित, अतिरेकी विनोद ! आणि कसलाही अतिरेक गैर असतो हे तुम्हा-आम्हाला पटलंच आहे— तेव्हा अतिरेकी विनोद गैर ! “ अस्वलाच्या गुदगुल्या ” त्या !— मग

असला अतिरेकी विनोद टवाळ माणसांनाच आवडणार हे रामदासांचं सांगणं ठीकच आहे !

सोज्वळ विनोद उत्स्फूर्त असण्यातच मौज ! तो ऐकताना किंवा वाचताना आपोआपच हसू आलं पाहिजे. आणि तो पुन्हा वाचताना, ऐकताना सुद्धा थोडंफार हसू यायला हवं.

तर अशा निर्मळ, मजेशीर विनोदाचे नमुने महाराष्ट्रात नक्की गवसतील अशी माहिती चंद्रलोकातल्या नागरिकांना मिळाली होती.

महाराष्ट्रात कोल्हटकर, गडकरी, अत्रे, देशपांडे, मिरासदार, पाटील, सामंत वगैरे जुन्या, नव्या विनोदी लेखकांबद्दल त्यानी ऐकलं होतं.

असे विनोदी लेखक महाराष्ट्रात ' झाले बहु ', ' आहेतही बहु ' आणि " होतील बहु " अशी कीर्ती त्यांच्या कानी पडली होती.

अन म्हणून चंद्रलोकीचा चंदर महाराष्ट्रातल्या पेशव्यांच्या पुणे शहरात येणार असं नक्की ठरलं !

# दोन

पुण्यातल्या नू. म. वि., मॉडर्न वगैरे शाळांत शिकणाऱ्या तीस, चाळीस पोरांनी सदाशिव पेठेत एक सन्मित्रमंडळ काढलं होतं. आठवड्यातून एक दिवस ही पोरं एकेका सन्मित्राच्या घरी सभा भरवून धुडगूस घालीत.

ही वेळ प्रत्येक घरी आठ, दहा महिन्यांतून एकदाच येत असल्यामुळे ह्या बालसभासदांच्या आया—जन्मदात्या आया, पगारी आया नव्हेत—ते चालवून घेत असत.

पुण्यात विनोदाचं बेणं अधिक रुजत असणार हा चंद्रवासीयांनी केलेला

अंदाज रास्त होता. पुण्यातली थोरं तर विनोदाची चव पेन्शनीत गेल्या-नंतर सुद्धा चाखीत असतच. पण सन्मित्रमंडळाची पोरंसुद्धा विनोदबुद्धी बाळगून होती. ही पाहा त्याची चुणूक !

ह्या पोरांनी आपल्या मंडळाच्या कार्यकारिणीच्या सभासदांना मजेत विनोदी टोपणनावं दिली होती. ऐका हं ती.

( १ ) क, ख, ग, घ, ङ ह्या ' क ' वर्गाच्या प्रतिनिधी सभासदाचं नाव ' कवड्या ! '
( २ ) ' च ' वर्गाच्या प्रतिनिधी सभासदाचं नाव ' चकल्या ! '
( ३ ) ' ट ' वर्गाच्या प्रतिनिधीचं नाव ' टरबुज्या ! '
( ४ ) ' त ' वर्गाच्या प्रतिनिधीचं नाव ' तवश्या ! '
( ५ ) ' प ' वर्गाच्या प्रतिनिधीचं नाव ' परश्या ! '
( ६ ) य, र, ल, व ह्या चार अक्षरांच्या प्रतिनिधीचं नाव ' यमक्या !'
( ७ ) श, ष, स, ह, ळ ह्या पंचाक्षरीचा प्रतिनिधी शरच्चंद्र !
( ८ ) ' क्ष ' चा प्रतिनिधी क्षितींद्रमोहन !
( ९ ) ' ज्ञ ' चा प्रतिनिधी ज्ञानेश !

ज्ञानेशपाशी ज्ञान फार कमी होतं. बऱ्याचदा त्याचा ' लाष्ठा ' कडून पहिला नंबर येई. पण तो एकुलता एक, लाडका मुलगा होता. त्याचं घर ऐसपैस होतं. पाठचा व्हरांडा आणि परसातली बाग ज्ञानेशाच्या मालकीची होती. म्हणून त्याच्या गोपाळ ह्या नावाऐवजी पोरांनी त्याला ज्ञानेश हे नाम दिलं.

अन यंदा हा ज्ञानेश मंडळाचा अध्यक्ष होता.

अन आज चंदर ह्या मंडळाला भेट देण्यासाठी येणार होता.

अन म्हणून आजची ही ' असाधारण ' सभा ज्ञानेशानं ऐटीत आपल्या घरी भरविली होती. इतर आठ सभासदांनी एकमतानं किंवा आठही मतांनी आपली संमती दिली होती !

ज्ञानेशनं पाठच्या व्हरांड्यात नेहमीप्रमाणं टेबल मांडलं होतं. आज त्यावर मुद्दाम परीट घडीची, भरतकाम केलेली छोटी चादर घातली होती.

टेबलाच्यापाठी अध्यक्षाच्या उंच पाठीच्या खास एका खुर्चीऐवजी तशाच दोन खुर्च्या ठेवल्यो होत्या आणि समोर डाव्या, उजव्या बाजूंना घडीच्य चार, चार मिळून आठ खुर्च्या मांडल्या होत्या.

हातात एक दोन्ही टोकांना वळलेलं नि तिथं भोकं असलेलं हाडूक घेऊन ज्ञानेश आपल्या अध्यक्षीय खुर्चीत ऊठबस करीत होता.

तेवढ्यात टरबुज्या हजर झाला.

ज्ञानेशची ती चुळबूळ पाहून आपल्या चेष्टेखोर स्वभावानुसार तो म्हणाला, " अरेच्चा ! – ज्ञानेशा, चंद्रलोकीच्या चंदरची ऊठबस करण्याची तालीम चाललीय होय ? त्यासाठीच तू ह्या उठाबशा काढतो आहेस ना ?"

ज्ञानेशनं रागारागानं टरबुज्याकडं पाहिलं. काय बोलावं ते न सुचल्यानं तो न उठण्याच्या निश्चयानं खुर्चीत धपकन बसला.

हळूहळू कवड्या, चकल्या आणि तवश्या आले.

टरबुज्या डावीकडल्या आपल्या ठरलेल्या तिसऱ्या खुर्चीत विसावला होता. त्याच्या डाव्या हाताला चकल्या आणि उजव्या हाताला तवश्या बसले.

टरबुज्या आणि तवश्या हलक्या आवाजात एकमेकांशी बोलण्यात गढले होते.

टरबुज्यावरला मघाचा राग ज्ञानेशच्या मनात धुमसत होता.

टेबलावरली घंटी दाबीत तो ओरडला, " अरे, अरे ! किती बेशिस्त वागता ! आता चंद्रलोकीचा चंदर येणाराय आपल्याकडं ! "

" ते आम्हाला ठाऊक्काय ! " चौघे सभासद एका सुरात उत्तरले.

" मग नीट आपापल्या खुर्चीत गप्प बसा तर – कवड्या, तू का उभा आहेस ? " आता अध्यक्ष कवड्यावर घसरले.

" ह्याचसाठी, बाबा – " कवड्यानं म्हटलं, " ज्ञानेशा, चंदरसमोर मला कवड्या न म्हणता कवी म्हण बरं का – "

" अच्चं होय ! — मग कविराज नको का ? " ज्ञानेशानं चिमटा घेतला.

त्याचवेळी परश्या आणि यमक्या उगवले. उजवीकडल्या पहिल्या नि दुसऱ्या खुर्चीत ते बसले.



तिथल्या पुढच्या दोन खुर्च्या रिकाम्या आहेत हे अध्यक्षमहाशयांच्या नजरेत आता भरलं — चक्क खुपलं.

पुनः मघाप्रमाणंच ते कारवादले, "हे कोण दोघे आले नाहीत अजुनी?"



मगाच्या त्याच्या खवचट प्रश्नाचा वदला घेत कवड्या म्हणाला,

"इंग्रजी शिकू लागल्यामुळं मराठी मूळाक्षरं विसरलास, ज्ञानेशा? यमक्यानंतर शरच्चंद्र आणि क्षितींद्रमोहन यायचे आहेत."

त्यावर चकल्या बोलला, "ते दोघे अगदी वेळेवर येणार आहेत."

तसा ज्ञानेश वतवतला, "अगदी वेळ झालीच की!"

"मग त्यांची दुक्कल आलीच की!" यमक्या यमकाच्या ठेक्यात उतरला.

आणि पायऱ्या चढून उरलेले दोघे सभासद उपस्थित झाले.

झिळमिळ्यांची पगडी, धोतर, डगला, उपरण्यासह हातात चिपळ्या घेतलेला, कीर्तनकाराच्या वेषातला शरच्चंद्र तिसऱ्या खुर्चीत वसला.

गुजराथी पगडी, मद्रासी उपरण्याची घडी, यू.पी.वाली शेरवानी, वंगाली पद्धतीचं धोतर आणि पायात दक्षिणी जोडा ह्या वेडगुजरी पोषाकातला क्षितींद्रमोहन शेवटल्या खुर्चीत टेकला.

इतर सहा सभासदांनी ह्या दोघांकडं काहीशा नवलानं, कौतुकानं पाहिलं.

ज्ञानेश मात्र चक्क मत्सरानं, रागारागानं त्यांच्या ह्या 'फॅन्सी ड्रेस' कडं वघत राहिला.

मग न राहवून आपल्या ह्या मत्सराच्या 'वड्या'चं तेल त्यांच्या 'फॅन्सी ड्रेस'च्या 'वांग्या'वर काढीत ज्ञानेश पुटपुटला, "आलात एकदाचे! मला वाटलं, ह्या नटण्या, थटण्यात वेळ वाया घालवून उशीर करता की काय! – हं ऽ! – चंद्रलोकी सगळं कसं वक्तशीर, वेळेवर आणि साधसुधं असनं वरं!"

"तुला हे कसं कळलं, ज्ञानेशा?" शरच्चंद्रानं प्रश्न केला.

"तर्कानं ताडलं मी! – म्हणजे असं की, ज्या अर्थी चंद्रलोकीच्य चंदरनं आपण आज येणार हे कळविण्यासाठी मला आगाऊ तार धाडली..."

तसे सगळे मुलगे — आपला ' फॅन्सी ड्रेस ' सावरीत शरच्चंद्र आणि क्षितींद्रमोहनसुद्धा — उठून टेबलाकडं धावले.

" ए, आम्हाला दाखव ना ती तार. आम्हांलासुद्धा ती बघण्याचा हक्क आहे — कार्यकारिणीचे सदस्य आहोत आम्ही — " सर्वांनी एकच गिल्ला केला.

ज्ञानेशाला हेच हवं होतं. त्यानं ऐटीत बुशकोटाच्या खिशातून तारेच्या फॉर्मच्या आकाराचा रुपेरी कागद काढला आणि उलगडून तो टेबलावर सावकाश पसरू लागला.

तो रुपेरी कागद नुसता पाहूनच कवड्याचं कविमन हेलावलं.

" अहाहा ! " तो उद्गारला, " चंद्रलोकीचा संदेश चंदेरी कागदावर ! वाहवा ! " अन पुढं मंगलाष्टकांच्या चालीवर तो गुणगुणला, " समसमा संयोग कीऽऽ जाहला ! "

तशी हातानं अक्षता उडविल्याचा अभिनय करीत टरबुज्यानं पुस्ती जोडली, " शुभमंगल — साऽ व धाऽ न ! "

साहजिकच कवड्यासकट सगळे खळखळून हसले.

कवड्या भारी खिलाडू वृत्तीचा होता ! आपण इतरांची चेष्टा करायची आणि इतरांनी आपली चेष्टा केली की उखडायचं हे मान्य नव्हतं त्याला. त्यामुळं तोही मनापासून हसला.

पण ज्ञानेश उगीचच वतवतला, " हं ! — टरबुज्या, सदा दुसऱ्यांची टर उडविण्याची वाईट खोड जडलीय बरं, तुला ! "

" ती तुम्ही सन्मित्रांनीच जडवलीत म्हटलं. मला ! टरबुज्या हे टोपण-नाव तुम्ही ठेवलंत. साहजिकच ते सार्थ करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकलीत. म्हणून मी बापडा ती पार पाडण्याची कोशिश करतोय ! "

आता हा आडफाटा आणखी वाढायला नको म्हणून कवड्यानं विचारलं, " तारेतला मजकूर कुठल्या भाषेत आहे रे ? "

कवड्या मोठेपणी चांगला मुत्सद्दी झाला असता ! — वस्तुतः त्याला

टेबलावर डोकावून चंदेरी तारेतला मजकूर वाचता आला असता. पण ज्ञानेशला आवडणारा मोठेपणा त्याला देण्यासाठी कवड्यानं तो प्रश्न केला.

त्याच्या अपेक्षेप्रमाणं खुषीत येत ज्ञानेशानं म्हटलं, "शुद्ध मराठीत आहे. बघ ना –"

आता तवश्याला हुक्की आली. तो हसत म्हणाला, "हात्तेच्या ! म्हणजे टरबुज्याची टर उडाली तर ! त्यानं मारे मराठी-इंग्रजी आणि इंग्रजी-मराठी हे दोन्ही कोश समयसूचकपणं टेबलावर आणून ठेवलेत ! – मघा मी येताच हेच मला सांगत होता पठ्ठ्या !"

मघाप्रमाणंच आताही सगळे सभासद – टरबुज्यासह– हसले. क्षितींद्रमोहनचं हसू सर्वांआधी थांबलं – कारण मघा ज्ञानेश बोलला ते त्याला जरा टोचलं होतं– आपला पोषाक बघून ज्ञानेश दिपल्यामुळं त्यानं नटण्या-थटण्याचा टोमणा मारला हे खरं !— पण चंद्रलोकी सगळं वेळेवर असतं आणि – साधंसुधं असतं असा शेरा खुश्शाल उच्चारला त्यानं. त्यातही आपल्याला कानपिचकी असणार !—

अन म्हणून क्षितींद्रमोहन म्हाणाला, "काय रे ज्ञानेश, चंद्रलोकी सगळं वक्तशीर असतं असा तू तर्क केलास !— चंदर तारेत लिहिल्या-प्रमाणं आता ठीक पाच वाजता आले तर तो तर्क खरा ठरेल !— पण तिथं सगळं साधंसुधं असतं हा शेरा तू कशावरून दिलास ?"

"अरे भाई, तो नव्हता नुसता शेरा ! तो होता तुमच्या पोषाकावर ताशेरा !" यमक्या आपल्या यमकबाज शैलीत उद्गारला.

खोटं नव्हतं हे ! – ज्ञानेशाचा चेहरा जरा उतरला.

अन गम्मत अशी की, सदा सर्वांची टर उडविणारा टरबुज्या आता ज्ञानेशाच्या मदतीला धावला.

"त्याचं असं आहे, क्षितींद्रमोहनबाबू," त्यानं म्हटलं, "ज्ञानेशानं तो शेरासुद्धा तर्कानंच उच्चारला होता. मात्र त्या तर्काला त्या तारेतच थोडा आधार होता ! – ती तार रुपेरी कागदावर लिहिली असली तरी

आपल्याकडं जसे पांढरे तारेचे फॉर्म असतात तसेच तिथं रुपेरी फॉर्म असणार ! — म्हणजे चंद्रलोकीचा रुबाव मारण्यासाठी काही चंदरनं रुपेरी कागद वापरला नाही ! — कसं ? ”

“ पण ह्यावरून तिथली साधीसुधी रीत कशी कळून येणार ? — त्यांची रीत रुबाबदार आहे हेच उमगतंय ह्यावरून — ” परश्या म्हणाला, “ बरोबर ! — पण ह्या रुपेरी कागदाला नक्षी, वेलबुट्टी केलेली नाही — आणि म्हणून तिथलं वागणं साधंसुधं असतं असा रास्त तर्क ज्ञानेशानं केला ! — संपलं ! ” टरबुज्यानं शिस्तीत युक्तिवाद ऐकविला.

दोस्तांनी तो मानला — ज्ञानेशानं आता मनमोकळा श्वास घेतला — त्या क्षणी अध्यक्षांची स्वारी टरबुज्यावर मनोमन खूष झाली. पण ही खुषी आभार मानून अध्यक्षानं व्यक्त करणं त्याला पटेना — पर्याय म्हणून ज्ञानेशानं टरबुज्याच्या पाठीवर थोपटलं.

अन बऱ्याच वेळानं त्याला आपल्या अध्यक्षपदाची जाणीव झाली. टेबलाखाली घंटी दाबीत तो ओरडला, “ सायलन्स ! सायलन्स ! — तर मी म्हणत होतो... ”

तेवढ्यात कवड्या मध्येच म्हणाला, “ ही वाक्यरचना ठीक नाही, ज्ञानेशा — बडे वक्ते ह्याऐवजी ‘ मला असं म्हणायचं आहे की — ’ — अशी सुरुवात करतात — ”

ज्ञानेश हे बरं सहज पचवील ? — दुसऱ्यानं सुचविलेलं त्याला सहसा रुचत नसे. मग ते पचणार कसं ?

तो लगेच सोडा वॉटरच्या बाटलीसारखा फसफसला, “ बरं, बरं, तू नको मला शिकवायला. आणि नकळत कवड्याची सूचना मानीत तो पुढं बोलला, “ तर मला असं म्हणायचं आहे की... ”

तसे सगळे सन्मित्र हसत सुटले.

ज्ञानेशानं लगेच चिडून बोलणं फिरवीत म्हटलं, “ तर — म्हणजे — मी म्हणत होतो की... ”

त्याच्या ह्या कोलांटउडीमुळं पोरांना आणखीच हशाची उकळी आली.

आता मात्र अध्यक्ष भलतेच वैतागले.

जोरजोरानं घंटी बडवीत ते किंचाळले; "लायसन्स !– लायसन्स !"

बिचारा ज्ञानेश ! रागाच्या भरात त्यानं 'सा' नि 'ला'ची गल्लत केली हे त्याचं त्याला उमगलंच नाही.

पण आठही सभासदांना ते लगेच कळलं आणि त्यांनी जणू एकमतानं टाळ्यांचा कडकडाट केला. ज्ञानेश भलताच कावराबावरा झाला !—

तशी क्षितींद्रमोहनला त्याची कीव आली. मघा तो जरा ज्ञानेशावर त्रासला होता तरी टरबुज्यानं छानदार फोड केल्यामुळं तो ते लगेच विसरला होता. मूळाक्षरातला 'क्ष' 'ज्ञ'चा पाठीराखा असतो ही आठवण आली त्याला.

आणि किंचित हसत क्षितींद्रमोहन म्हणाला, "ज्ञानेशा, तू 'सायलन्स' ऐवजी 'लायसन्स' म्हटलंस, गड्या ! आम्हा हसण्याचं तच लायसन्स दिलंस—परवाना दिलास—आम्ही तो टाळ्यांच्या गजरात मान्य केला. आता तू सुद्धा तुझ्या जिभेनं केलेली ही गल्लत हसण्यावारी ने—"

आता ज्ञानेशाला उलगडा झाला. पण त्याच्या अंगी खिलाडूपणा शून्य असल्यामुळं हसण्यावारी नेण्याची गम्मत त्याला पटली नाही—

'शेषं कोपेन पूरयेत्'—'सुचलं नाही की चिडायचं'— ह्या न्यायानं तो घंटी जोरजोरानं दावीत सुटला.

आणि त्या आवाजाच्या वर आपला आवाज चढवीत तो किंचाळला, "वरं, बरं, श्यमजलं !– हुं !– ला सायलन्स ! एकदम सायलन्स !"

आता हे राजश्री चांगलेच भडकले आहेत हे ओळखून कार्यकारिणीच्या आठही सभासदांनी हसण्याचा मोह टाळला.

आवाज जरा उतरवीत ज्ञानेश पुढं म्हणाला, "तर मी म्हणत होतो की, चंदरनी आपल्याला आगाऊ तार धाडली त्याअर्थी चंद्रलोकीच्या माणसांना वेळेचं फार महत्त्व आहे."

" पण आम्ही सगळे – शेवटी आलेलो आम्ही दोघेसुद्धा वेळेवर हजर झालोय. मग तुझा हा तर्क कशाला घोळवतोयस ? " शरच्चंद्रानं न राहवून विचारलं.

ज्ञानेशला त्या प्रश्नाचं उत्तर सुचेना. त्यानं सोइस्करपणं तिथं दुर्लक्ष करीत चंदेरी तारेची घडी करून ती खिशात ठेवली. आवंढ्यावरोबर थोडा थोडा राग गिळण्याचा अवघड प्रयोग करीत होता तो.

एवढ्यात त्याला आपण टेबलावर ठेवलेलं ते हाडूक दिसलं. त्यानं विशेष कौतुकानं अपूर्वाईची वस्तू उचलल्यागत ते हातात घेतलं, निरखलं आणि परत टेबलावर ठेवलं.

लगेच त्याच्या अपेक्षेप्रमाणं टरबुज्यानं विचारलं, " कसलं हाडूक रे हे ?"

मानेला झटका देत ज्ञानेश उत्तरला, " हाडूक नव्हे हे, मिस्टर ! मी शोध लावलेला कुत्र्याशी बोलण्याचा फोन आहे हा ! – टेलिफोन, चक्क !"

" काय ? – खरं ? " सन्मित्र पुटपुटले.

" अर्थात ! मी ह्या फोनमधून बोललो की, फाटकाशी बसलेला आमचा टिपू कुत्रा मला उत्तरं देणार. चंदरना येताना लांबून पाहिलं की, तो मला त्याच्या भाषेत फोनवर वर्दी देणार "–ज्ञानेशानं सांगितलं,

गेली सात मिनिटं शिस्तीत आपापल्या जागी बसलेले अष्ट सभासद घाईनं टेबलाजवळ पोचले. त्यांनी टेबलाला गराडा घातला. एकच गलका सुरू झाला.


" ए ज्ञानेशा, " टरबुज्या म्हणाला, " आम्हाला पाळीपाळीनं बोलू दे ना तुझ्या फोनमधून – "

" छट ! " ज्ञानेश तटकन बोलला, " चंदर आल्यावर त्यांच्यासमोर मी फोनचं प्रात्यक्षिक दाखविणार आहे. "

आपला पाठीराखा ' क्ष ' कोणत्याही शब्दाच्या मध्ये आला की, ज्ञानेश असा तोडून दोन अक्षरी, अशुद्ध उच्चार करी. शब्दाच्या आरंभीचा ' क्ष '

तो नीट उच्चारीत असे.

त्याचा हा अशुद्ध उच्चार त्याच्या दोस्तांच्या अंगवळणी — खरं म्हणजे, कानवळणी पडला होता. तरीही टरबुज्या त्रासून पुटपुटला, " गेलास



उडत ! प्रात्यक्षिक हा शब्द धड उच्चारता येत नाही. नि म्हणे हा चंदरसमोर प्रात्यक्षिक दाखविणार ! ''

त्याचं हे चुटपुटणं अचूक ज्ञानेशाच्या कानी पडलं. ते तसं पडावं ह्या हेतूनंच मुळी टरवुज्या त्याच्या कानाशी हळू चुटपुटला होता.

ज्ञानेश डोळे वटारून त्याच्याकडं बघणार होता. पण मघा त्यानं केलेली मदत वेळीच आठवल्यानं ज्ञानेशानं नाइलाजानं कानाडोळा केला.

मग अध्यक्षीय अधिकारवाणीनं तो म्हणाला, " आता सगळे जाग्यावर बसा. ''

बसले सगळे जाग्यावर--

तसा ज्ञानेश पुढं म्हणाला, " चंद्रलोकाहून चंदर इथं येणार हे पंधरा दिवसांपूर्वी फोनवर मला कळताच मी ते तुम्हाला सांगितलं होतं. चंदरना आपल्याकडले विनोदाचे नमुने हवे आहेत हे सुद्धा मी तुम्हाला सांगितलं होतं. ''

" आ-णि-जेहेत्ते कालाचे ठायी..." आपल्या कीर्तनकाराच्या वेपाला शोभेल अशा ढंगात शरच्चंद्र बोलला, " आम्ही समस्त सभासदांनी विनोदाचा कसला ना कसला नमुना तयार ठेवला आहे."

ह्यावर समस्त सभासद मजेनं हसले. ज्ञानेशानं मानेनं ' ठीक ' म्हटलं.

एवढ्यात टेबलावर ठेवलेल्या हाडकातून ' भुं-भुंक ' अशी टिपूच्या टिपेच्या षड्ज पंचमात ' रिंग ' वाजलेली सर्वांनी ऐकली.

अरेच्चा ! म्हणजे ज्ञानेशानं बात मारली नव्हती तर !

हे कळल्यागत सर्वांकडं एक तुच्छतेचा कटाक्ष टाकीत ज्ञानेशानं हाडूक कानाला लावलं. मग विजयी स्वरात तो त्या ' फोन 'मध्ये म्हणाला, " भुंक..."

आणि मित्राना उद्देशून त्यानं म्हटलं, " कुत्र्यांच्या भाषेत ' भुंक ' म्हणजे ' हलो ' बरं का." मग तो पुनः फोनमध्ये बोलू लागला, " भुंक भुः-भों-भुं-भुं--"

त्याचं काय आहे की, मला ते ठाऊक होतं पण मी विसरलो." आणि आपल्या स्वभावानुसार मित्रांवर घसरत त्यानं विचारलं, " काय रे तुम्हा कोणाला आठवतीय का कसलीशी ती आपली लाडकी सवय ? "

कवड्याखेरीज सर्वांनी नकार दिला.

टरबुज्यानं न राहवून म्हटलं, " म्हणजे त्याचं असं आहे, ज्ञानेशा, आम्हाला ते ठाऊकच नसल्यानं कसं आठवणार ? "

ह्यावर मित्रांना हसण्याची सवड न देता– ती दिल्यानं चंदरचं आपणा सर्वांबद्दल वाईट मत होईल ह्या भीतीनं कवड्या हळूच बोलला, " मला वाटतं, मला ती ठाऊक आहे. सांगू का मी ? "

" अरे, अरे ! – परवानगी कसली विचारतोस ? आमचाच तर तू ! तुला ठाऊक असलं की ते आम्हाला ठाऊक असल्यातच जमा ! – सांग लौकर सांग." आपल्या ' तुमचं ते आमचं आणि आमचं ते आमचं ' ह्या स्वार्थी वृत्तीनं ज्ञानेशानं म्हटलं.

" आपल्याकडं भाऊराव कोल्हटकर नावाचे नामांकित गायक नट होऊन गेले ! त्यांचे रसिक चाहते त्यांना भाऊराव न म्हणता प्रेमानं भावड्या म्हणत." मग चंदरकडं बघत कवड्या पुढं म्हणाला, " ह्या घटनेला उद्देशूनच बोललात ना तुम्ही ? "

" होय कविराज ! " चंदर कौतुकानं उत्तरला आणि त्यानं हात जोडीत म्हटलं, " नमस्ते ! "

कवड्या तत्परतेनं बोलला, " नमस्ते ! – पण तुम्ही मला कवड्या म्हणा. आणि– आणि ज्ञानेश तू देखील कवड्याच म्हण. त्या नावाची महती पटली मला. ती ठाऊक असूनही नसल्यागत झाली होती ! तो ते भावड्या अन मी कवड्या ! अहा ! कवड्या ! कवी नव्हे ! "

" मग म्हणूनच मी मघा तुला कवड्या म्हटलं ! तर केवढा उखडलास" ज्ञानेश पुटपुटला.

त्याच्या ह्या कोलांट उडीनं थक्क झाला कवड्या. चंदरसमोर असली

वादावादी ठीक नाही हे विसरून तो पटकन म्हणाला, " अरेच्चा ! तेव्हा तुला ह्या नावातली नाटकी जम्मत ठाऊक तरी होती का ? – की ' आधी सांगितले आणि मग कळले ' असा खाक्या आहे तुझा ? "

त्यावर सगळे सन्मित्र तोंडावर हात दाबून खुदकन हसले.

आता आपल्या अध्यक्षपदाचा अधिकार गाजविण्यावाचून दुसरं काय करणार होता ज्ञानेश ? तरातरा टेबलाकडं जाऊन त्यानं घंटी बडवीत म्हटलं " ला–सायलन्स ! " आणि डावीकडल्या दुसऱ्या खुर्चीकडं येत त्यानं परिचयविधी पुढं चालू केला.

" हं चंदर, हा ' च ' वर्गाचा प्रतिनिधी चकल्या–"

" नमस्ते ! " चकल्या बोलला.

" नमस्ते ! " चंदरनं म्हटलं आणि पुढं हळूच प्रश्न केला, " तिखट-मिठाचे भोक्ते आहात वाटतं तुम्ही ? "

चकल्या चुळबुळत उत्तरला, " अं-तसंच नाही काही – "

" नाही काही कसं ? " त्याच्या पलीकडल्या बाजूला उभ्या असलेल्या टरबुज्यानं त्याला कोपरखळी देत विचारलं, " तू रोज पँटच्या खिशात चकल्या भरून शाळेला नाही का येत ? "

" पण त्यातल्या निम्म्या अधिक तू पळवतोस–" चकल्यानं सांगून टाकलं.

" पण मुळात तू आणतोस म्हणून मी पळवतो. म्हणजे आम्ही ठेवलेलं तुझं चकल्या हे टोपण नाव सार्थच आहे ! – कसं ? " टरबुज्यानं म्हटलं.

तिथं दुर्लक्ष करीत ज्ञानेश म्हणाला, " हा ' ट ' वर्गाचा प्रतिनिधी टरबुज्या ! येता जाता सर्वांची टर उडविण्याची वाईट खोड आहे ह्याची–"

" नमुना दिसला मघा ! एकूण, ह्यांची डर बाळगायला हवी म्हणायची ! " चंदर मंद स्मित करीत उद्गारला.

तसा न राहवून आपली पाळी येण्याआधी पुढं होत यमक्या बोलला, " पण कर नाही त्याला डर कशाला, सर ? "

लगेच चंदर उत्तरला, "तुम्ही यमकवेड्या वामनपंडिताचे वंशज आहात तर!"

यमक्या थक्क होऊन क्षणभर चंदरकडं बघत राहिला. मग राजाला पाठ न दिसू देता त्याचे नोकर जसे मागं, मागं सरतात तसा यमक्या आपल्या खुर्चीकडं सरकला.

आता चौथ्या नंबराकडं जात ज्ञानेश म्हणाला, "हा 'त' वर्गाचा प्रतिनिधी तवश्या–"

"तवश्या!" चंदरनं म्हटलं, "तवसं हा काकडीचाच प्रकार ना?"

"अरे वा:!" तवश्या कौतुकानं उद्गारला, "तुम्हाला मराठीमधले एवढे बारकावेसुद्धा ठाऊक आहेत!"

"तशी मराठी भाषा आम्ही वेगळ्या भाषांच्या अभ्यासात शिकतो. पण तुमच्या इथं यायचं म्हणू मी शक्य तेवढं मराठीचं अधिक ज्ञान मिळविलं."

झालं! चंदरच्या तोंडून ज्ञान हा जणू परवलीचा शब्द मिळाला ज्ञानेशाला.

घसा खाकरीत तो म्हणाला, "मित्रांनो..."

टरबुज्यानं त्याला अडवीत सुधारणा केली, "सन्मित्रांनो..."

"समजलं!" ज्ञानेश गुरगुरला, "सन्मित्रांनो, आपल्या पाहुण्यांची वृत्ती पाहिलीत ना? चंद्रलोकीच्या ह्या आपल्या मित्रा-सन्मित्राकडून आपण ही वृत्ती शिकून घ्यायला हवी! त्यांचं अनुकरण करायला हवं–"

इथल्या सन्मित्रांनी तत्परतेनं टाळ्या वाजविल्या तसा ज्ञानेश 'मुडा'त आला.

उजवीकडल्या पहिल्या खुर्चीकडं जात तो बोलला, "हं चंदर, हा 'प' वर्गाचा प्रतिनिधी परश्या–"

"नमस्ते, चंदरजी–" परश्यानं म्हटलं.

" नमस्ते, परसोजी–" चंदरनं म्हटलं.

पुढल्या खुर्चीकडं जात ज्ञानेश म्हणाला, " हा 'य, र, ल, व' चा प्रतिनिधी यमक्या ! "

" वा: ! " मंद स्मित करीत चंदर उत्तरला, " वामन पंडितावद्दलचा माझा तर्क योग्य होता तर ! नमस्कार यमकोजी ! "

" नमस्कार, चंदर–जी " किंचित ओशाळ्या स्वरात यमक्या बोलला.

नंतरच्या खुर्चीकडं जाऊन ज्ञानेशानं ओळख करून दिली, " हा 'श ष, स, ह, ळ' ह्या पंचाक्षरांचा प्रतिनिधी शरच्चंद्र–"

तसा शरच्चंद्र भराभरा म्हणाला, " तुमच्या आणि माझ्या नावात थोडं साम्य आहे वरं का. नमस्ते, चंदर ! "

" हुं, नमस्ते, शरच्चंदर !" चंदरनं लगेच उत्तर दिलं.

शेवटल्या खुर्चीपाशी जात ज्ञानेशानं म्हटलं, " हा 'क्ष' चा प्रतिनिधी क्षितींद्रमोहन ! "

आपलं ठराविक मोजकं स्मित करीत चंदर उद्गारला, क्षितींद्र मोह-न पण तुम्हाला लांबलचक नावाचा मोह दिसतो आहे चक्क ! "

" हंऽ ! म्हटला तर आहे म्हटला तर नाही " क्षितींद्रमोहन उत्तरला, " कारण आई मला क्षिती म्हणते, दादा तिंद्रु म्हणतो वाबा मोन्या म्हणतात ! एका लांबलचक नावाची तीन छोटी नावं ! " आणि त्यानं खोटा खोटा सुस्कारा सोडला.

तसे सगळे सभासद– अध्यक्ष–नव्हे हं हसले.

त्यावर चंदर म्हणाला, " म्हणजे तुम्हाला एकाऐवजी तीन नावं मिळाली आहेत म्हणून तुम्ही हा पंचरंगी अंहं पंचढंगी पोषाक केलाय वाटतं ! "

" कमाल आहे तुमची, चंदर ! माझ्या ह्या दोस्तांना माझ्या पोषाकातलं हे इंगित उमगलं होतं काय कोण जाणे ! पण तुम्ही एका दृष्टिक्षेपात ते ओळखलंत ! " आणि क्षितींद्रमोहन मनापासून हसला.

ज्ञानेशाला हा चक्क कालापव्यय वाटला. स्वतःची ओळख चंदरला करून देण्याची कोण घाई झाली त्याला !

उगीचच घसा खाकरीत तो वळला. चंदरही वळला. टेबलामागं ठेवलेल्या उजव्या खुर्चीकडं जाण्याची खूण करून तो डाव्या खुर्चीजवळ आला.

अन त्यानं ऐटीत म्हटलं, " मी ज्ञानेश ! – आमच्या सन्मित्रमंडळाचा अध्यक्ष ! "

" नमस्ते, अध्यक्षमहोदय ! " चंदरनं नमस्कार केला.

पण ते महोदयांना रुचलं नाही. मघापासून आठही सभासदांना त्या अपूर्वाईच्या पाहुण्यानं दुरून नमस्कार केला हे ठीक ! पण आपण अध्यक्ष !

ऐटीत उजवा हात पुढे करीत ज्ञानेश म्हणाला, " आपण मजेत हस्तांदोलन करू या – इंग्रजी पद्धतीनं हाउ डु यू डु वगैरे–"

" माझा हस्तस्पर्श सोसेल तुम्हाला ? चंदरनं हळूच विचारलं.

" अर्थातच सोसेल ! " ज्ञानेश टेचात म्हणाला.

आणि आपल्या सन्मित्रांचा हात तो धरीत असे त्यापेक्षा अधिक सलगी दाखविण्यासाठी अधिक जोरानं त्यानं चंदरचा हात पकडला.

आणि – " हाय – हाय – हुय – ओय – ओय – " असं ओरडत त्यानं तो तटकन सोडला. हात जणू लुळा पडल्यागत वाटत होतं ज्ञानेशला. त्यानं हात जोरानं झटकला – पण छे: ! –

गालात जीभ घालीत चंदर बोलला, " ह्यासाठी मी तुम्हाला मोघम सूचना दिली मघा. चंद्रलोकीच्या माणसांचा स्पर्श गारठून टाकण्याइतका थंड असतो बरं ! "

ज्ञानेशाची वरी जिरली म्हणून सगळ्या पोरांना मनातून आनंद झाला होता – आणि तो दडविण्याचा प्रयत्नही ते करीत नव्हते. आनंदामुळं खिदळण्याला मात्र त्यांनी आवर घातला होता पण कधी कधी उघड खिजविण्यापेक्षा असं छुपं खिजवणं असह्य होतं.

ज्ञानेश स्वतःचा राग कसा तरी आवरीत पुटपुटला " तितका काही – गारठून – टाकण्याएवढा – थंड – नव्हता तुमचा स्पर्श – पण – त्याचं काय आहे की, आधी कल्पना नसल्यामुळं जरा – म्हणजे – किंचिन – कळा आल्या क्षणभर – आता – आता ठीक आहे ! "

ठीक असल्याचा आव ज्ञानेशानं तोंडानं आणला तरी त्याच्या उजव्या पंज्यातून विलक्षण झिणझिण्या येत होत्या. न राहवून तो हळूच आपल्या मतानं सर्वांच्या नजरेआड टेबलावरल्या चादरीच्या आडोशानं डाव्या हातानं आपला हुळहुळता पंजा दावीत होता.

उजव्या खुर्चीत बसत चंदरनं म्हटलं, " मला वाटनं, आपण कामाला सुरुवात करावी आता. "

लगेच ज्ञानेश कसावसा अध्यक्षपदात घुसला. नाइलाजानं त्याला डाव्या हातानं घंटी वाजवावी लागली.

नेहमीप्रमाणे घंटी बडवीत न राहता लगेच तो म्हणाला, " सा – ला – सायलन्स ! – आता – त्या – चंदरना – आपण – सर्वांनी – विनोदाचे समुसे नादर – अं – आपलं – विनोदाचे नमुने – सादर करायचे – "

बहुधा तळपायाप्रमाणं तळहाताची कळसुद्धा मस्तकात पोचत असावी ! आणि ज्ञानेशाच्या तळहाताची कळ भलतीच थंड असल्यामुळं त्याची जीभसुद्धा थंडावली होती – म्हणून ती जरा वाकडी वळली. पण सर्व सन्मित्रांनी जराही न हसण्याचं सौजन्य दाखवलं.

अन् तेवढ्यात चंदर बोलू लागला – साहजिकच सगळ्याचं लक्ष तिकडं वेधलं गेलं.

टेबलावर ठेवलेल्या त्या पाढऱ्याशुभ्र पेटीचा निर्देश करीत चंदरनं सुरुवात केली.

" हे पहा, सन्मित्रांनो, हे विनोदमापक यंत्र आहे. प्रत्येक विनोदाचा दर्जा आणि मिळालेले गुण ह्या दोन्हींची नोंद करणार आहे हे यंत्र. आणि

ही वाटोळी लहानशी वस्तू म्हणजे एक विलक्षण प्रभावी टेप रेकॉर्डर आहे. तुम्ही सर्वांनी ऐकविलेले विनोदाचे नमुने हा टेपरेकॉर्ड शिस्तीत



उतरून घेईल. म्हणजे चंद्रलोकी गेल्यावर मी सगळे नमुने आमच्या लोकांना ऐकवू शकेन. आणि – वरं का, "प्रथमच किंचित मिस्किल स्मित करीत तो हळूच म्हणाला," मघा येताक्षणीच मी हा टेपरेकॉर्डर सुरू केला होता. त्यामुळं आतापर्यंत इथं झालेलं सगळं संभाषण ध्वनि-मुद्रित झालं आहे. अन त्या संभाषणातसुद्धा बराच अभावित, नकळत घडलेला विनोद मला नक्कीच आढळणार! – पण ते राहू द्या. तुम्हापैकी ज्याचा विनोदी किस्सा ह्या यंत्रावर उच्चांक गाठेल तो सर्वोत्कृष्ट ठरेल. आणि त्या विनोदकर्त्याला चंद्रलोकांच्या वतीनं मी रौप्यपदक देणार."

ते पदक आपल्यालाच मिळणार या खात्रीनं ज्ञानेशानं आपल्या हाडकाच्या फोनकडं नजर टाकली नि तो बोलला, "ठीक! – छान!"

## चार

सवयीनं पुढं येणाऱ्या उजव्या हाताऐवजी मघाप्रमाणंच ज्ञानेशानं डाव्या हातानं घंटी वेडीवाकडी दाबली थोडीशी.

मग त्यानं म्हटलं, "आता कोण सुरुवात करतोय?"

"मी करावी म्हणतोय –" यमक्या उत्तरला.

वस्तुतः कोणीतरी सुरुवात करायलाच हवी होती. ज्ञानेशानंच मुळी ही विचारणा केली होती.

तरीसुद्धा यमक्याचं उत्तर ऐकताच तो खोचक स्वरात पुटपुटला,

"हुं! असा मीपणा मिरवून हा पहिला नंबर मिळविलास तरी तुझा

विनोद पहिल्या नंबराचा ठरून तुला रौप्यपदक मिळेल अशा मारू नकोस गमज्या — ”

“ समज्या रे समज्या ! ” यमक्याचं उत्तर हजर. मग घसा खाकरीत तो म्हणाला, “ उहुम ! चंदर, अध्यक्ष ज्ञानेश आणि सन्मित्रहो, यमक्या ना मी ? तर ऐका माझं कवन नामी. मी आहे जातीचा वाणी । चालवितो तेलाची घाणी । असली गाइन मी रडगाणी । हीच ना तुमची विचारसरणी । ”

“ होयच मुळी ! ” ज्ञानेशासह सगळे सन्मित्र उद्गारले.

“ हुकली, साफ हुकली ! — ही झाली अपेक्षाभंगाची विनोदी चुणूक पहिली — ” यमक्यानं म्हटलं, “ मी गाणार नाही रटाळ गाणी । सांगणार आहे विनोदी कहाणी । कोणाची ? — एका बहिऱ्या कुटुंबाची. ऐका बहिऱ्या माणसांचे प्रकार तीन ! एक — ज्यांना थोडं कमी ऐकू येतं तो. दुसरा — ज्यांना मुळीच ऐकू येत नाही तो. हे लोक ठार बहिरे असतात. पण ह्यांतल्या काही जणांना मतलबापुरतं ऐकू येतं. म्हणजे आपल्याला हवं असेल ते ऐकू आलंच आहे असं गृहीत धरून ते सोइस्करपणं स्वत:ला आणि इतरांना फसवितात ! — हा झाला बहिऱ्यांचा तिसरा प्रकार ! — तर रामभटजी आणि कुटुंबीय मंडळी ह्या तिसऱ्या प्रकारची बहिरी होती. रामभटजी बापडे अगदी दरिद्री होते. खूप दिवसांत त्यांना यजमानाकडून जेवणाचं आमंत्रण मिळालं नव्हतं. एक दिवस ते रस्त्यातून पाय ओढीत जात असताना त्यांचे एक जुने यजमान त्यांना भेटले. भटजींचं कसं चाललं आहे, हातातोंडाची व्यवस्थित गाठ पडतीय ना — म्हणजे रोज जेवायला मिळतं ना, ह्या अर्थानं आपला हात तोंडाशी नेत यजमानांनी प्रश्न केला, ‘ ठीक चाललं आहे ना, भटजी ?’— भटजींना अर्थातच एकही शब्द ऐकू आला नाही. पण भोजनाच्या आमंत्रणासाठी बापडे वखवखले होते. यजमान आपल्याला जेवणाचं आमंत्रण देत आहेत असं सोइस्कर ऐकू आलं त्यांना. खुषीत मान डोलवीत ते पुटपुटले, ‘ ठीक आहे, ठीक आहे ’ आणि

तुरूतुरू घरी आले. त्यांच्यासारखीच ठार बहिरी असलेली त्यांची बायको माजघरात मुलाला थोपटीत बसली होती. भटजींनी आपली अपूर्वाईची बातमी तिला सांगितली." – कोकणी पद्धतीनं नाकात बोलत यमक्या सांगू लागला. " तर भटजी म्हणाले, ' अगे यजमानांनी मस आज जेवा-यास बोलावल्यानी हो. ' आणि यजमानांची ओळख तिला पटावी म्हणून त्यांच्या बंद गळ्याच्या कोटाची खूण दाखविण्यासाठी भटजींनी आपल्या गळ्याला आणि मनगटाला हात लावला. झालं ! बायको होती लंकेची पार्वती ! तिच्या अंगावर सोन्याचा फुटका मणी नव्हता. तिनं त्या खुणांचा सोइस्कर अर्थ लावला की, कधी नव्हे तो नवरा आपल्याला दागिना करणाराय, आणि गळ्यातली बोरमाळ करू की, हातातल्या पाटल्या करू असं स्वारी पुसतीय ! खुदूखुदू हसत ती पळाली सैपाक खोलीत. तिथं ह्या जोडप्याची प्रौढकुमारी बहिरी मुलगी जोंधळ्याच्या भाकरी बडवीत बसली होती. भटणीनं दोन बोटं नाचवीत म्हटलं, ' अगो, मस इकडून विचारणं झालं की, तुला माळ करू की पाटल्या ? ' – आणि तिनं स्वत:च्या गळ्याला आणि मनगटाला स्पर्श केला. ह्या खाणाखुणा नि आईचा फुललेला चेहरा पाहून लेकीला वाटलं, वडिलांनी आपल्यासाठी दोन स्थळं आणली आहेत, गळ्याला आणि मनगटाला हात लावून आई मंगळसूत्राचा नि हिरव्या चुड्याचा निर्देश करतीय ! – हसत, मुरका मारीत भाकरीच्या पिठाचा गोळा हातात घेऊन तशीच गेली ती मागील दारी. तिथं जनी मोलकरीण जात्यावर जोंधळे दळीत होती. तिला मुलगी म्हणाली, ' अगो, अगो जने, बाबांनी माझ्यासाठी दोन स्थळं आणली आहेत हो ! एक गृहस्थाचं नि दुसरं भिक्षुकाचं ! आई विचारतीय, त्यातलं कुठलं हवं तुला ? इश्श ! मी काय गो सांगणार ? आणि पुन: तिनं जंगी मुरका मारला ! – जनी त्या बहिऱ्या कुटुंबातलीच बहिरी मोलकरीण ! तिला काही ऐकू आलं नाहीच पण मुलीचा मुरकाही तिला कळला नाही. तिला वाटलं, मुलगी नाक मुरडून आपण दळलेल्या पिठाला नावं ठेवतीय आणि दोन बोटं

दाखवून पीठ दुसऱ्यांदा दळायला सांगतीय. म्हणून जात्याच्या खुंट्यावर दगड हाणीत ती पुटपुटली, ' जळ्ळं मेलं ! तुमचं असंच ! हात तुटेस्तंवर मी मेली दळतीय आणि पीठ भरड झालंय, पुनः दळ अशी तुमची कुरकुर ! — ' म्हणजे प्रत्येकाला आपल्या मतलबापुरतं ऐकू आलं ! — संपलं ! " अन् यमक्या खाली बसला.

सगळे मुलगे, नकळत ज्ञानेशसुद्धा, हसले. चंदरनं मंद स्मित केलं. मग त्यानं खिशातून रूपेरी नोंदवही काढली आणि यंत्रात टिपलेलं त्यानं चांदीच्या पेनानं वहीत लिहीलं.

ज्ञानेशानं जपून उजव्या हातानं घंटी दाबीत विचारलं, " आता कोण ? "

तसा डावीकडल्या चौथ्या खुर्चीवरला तक्र्या आणि उजवीकडल्या खुर्चीतला परश्या असे दोघे एकाच क्षणी उठून येऊन मध्यभागी शेजारी, शेजारी उभे राहिले.

अन तक्र्या म्हणाला, " यमक्यानं विनोदी कहाणी सांगितली. परश्या आणि मी द्विभाषिक विनोदी किस्सा सुनावणार आहोत— "

स्मित करीत चंदरनं विचारलं, " तुम्ही दोघे जुळे भाऊ आहात काय ? "

" होय, होय ! " दोघे एका सुरांत उत्तरले. चंदरनी आपल्याबद्दल एवढी आपुलकी दाखवली म्हणून ते खूप झाले.

" बरं, " चंदरनं पुढं विचारलं, " तुम्हाला आणखी भावंडं आहेत काय ! "

" आहेत की ! " तक्र्या उत्तरला.

" दोन मोठ्या बहिणी आणि पाठची एक बहीण नि सर्वात धाकटा भाऊ. " परश्यानं पुस्ती जोडली.

" मिळून आम्ही सहा भावंडं ! " दोघांनी गोळाबेरीज ऐकविली.

" सहा ?— म्हणजे तृत तुमच्या भारत सरकारनं परवानगी दिली आहे

त्याच्या दुप्पट, तिप्पट !– त्यामुळं तुमची लोकसंख्या भरमसाट वाढली ! आमच्या चंद्रलोकात आमच्या लोकसंख्येला आम्ही कायमची सुंदर मर्यादा घातली आहे. ऐकायची आहे का आमची ती अजब कहाणी !– की, तुमचे विनोदी किस्से ऐकल्यानंतर मी ती सांगू ? ''

'' आता– आताच– सांगा, चंदर– '' सर्वांनी– ज्ञानेशसह– आग्रह केला नि बरोबर टाळ्यांचा गजरही केला.

तशी चंदरनं मोठ्या डौलात मान तुकवली नि तो सांगू लागला.

'' मला असं सांगा, सन्मित्रांनो, '' त्यानं प्रथम सार्वजनिक प्रश्न केला. '' चंद्राची किती नावं तुम्हाला ठाऊक आहेत ? ''

'' शशी, सुधाकर, इंदू, चंद्रमा– अ– निशिकांत– हिमांशु– '' कवड्यानं सुचली ती नावनिशी उच्चारली.

'' छान ! '' चंदर उत्तरला, '' पण त्या नावातलं सुधाकर हे नाव गिळायचं. ''

'' ते का !– चंद्राचंच नाव आहे ना ते ? '' शरच्चंद्रानं म्हटलं.

होय ना ! पण आम्ही काही विशिष्ट उद्देशानं चंद्राची वेचक आठच नावं घेतली आहेत !– तो उद्देश नंतर सांगतो– चंद्राची ती आठ नावं ही !– इंदु, शशी, सुधांशु, हिमांशु, शशांक, चंद्रमा, निशिकांत आणि रजनीनाथ– ''

'' म्हणजे कवड्या, तू आठांपैकी पाचच नावं सांगितलीस– म्हणजे तू आठपंचमांशच पास झालास ! '' ज्ञानेशानं खिजवलं. '' आठ पंचमांश पास झाला असता कवड्या तर त्याला एकशेसाठ टक्के मार्क मिळाले असते अध्यक्षा ! तुझ्या मनात पाच अष्टमांश म्हणायचं होतं. टरबुज्य बोलला.

'' आणि कवड्यानं सहा नावं सुचविली. त्यांतली पाच कसास उतरली ! तुम्हा, आम्हाला एकसुद्धा नाव आठवलं नाही, ज्ञानेशा–'' चकल्यानं हळूच टोचलं.

" ते कशावरून ? मलासुद्धा ही नावं सुचली होती बरं, चकल्या. कवड्याची जिथं तिथं घाई असतीय ना ? " ज्ञानेश वतवतला. " त्यामुळं अध्यक्षाची ' झाकली मूठ ' सव्वा लाखाची राहतीय ना ? " यमक्यानं म्हटलं.

" आता हे पुरे !– चंदरना पुढे बोलू द्या, गड्यांनो– " कवड्या म्हणाला आणि त्यानं हळूच आठवण केली, चंदरचा चिमुकला पण प्रभावी टेपरेकॉर्डर चालू आहे हं ! "– तसे सगळे चपापले.

स्मित करीत चंदर बोलू लागला, " तर आमच्या चंद्रलोकात मी मघा सांगितलेली आठ घराणीच आहेत– त्यांच्या चार जोड्या मी मघा उच्चारलेल्या अनुक्रमानं ठरल्या आहेत. त्या जोड्यांनी एका पिढीत परस्परांशी विवाहसंबंध जुळवायचे. पुढल्या पिढीत एक सोडून एक, म्हणजे एक, तीन– दोन, चार ह्या घराण्यांनी नातं जोडायचं. अशा रीतीनं प्रत्येक घराण्याच्या उरलेल्या सात घराण्याशी संबंध जुळल्यावर पुन: पहिल्या एक, दोन– तीन, चार त्या जोड्या जमवायच्या ! कळलं ? "

" पण एक, दोन ही जोडी दोन, अशी जुळविली तर चालतं काय ? कवड्यानं प्रश्न विचारला.

" वा: ! मार्मिक सवाल केलात हं– एक दोन अशीच जोडी धरायची. तिची दोन एक अशी फिरवाफिरव करायची नाही. तेव्हा मंडळी ह्या आठ घराण्यांच्या एकूण किती जोड्या होतील ? " चंदरनं प्रश्न केला. कवड्यानं खिशातून डायरी पेन्सिल काढली नि भराभर आकडेमोड करीत तो उत्तरला, " अठ्ठावीस जोड्या होतील ! "

" बरोबर " चंदर कौतुकानं म्हणाला, " काव्याप्रमाणं तुम्हाला गणिताचीसुद्धा आवड दिसतीय, कवड्याजी ! – तर सन्मित्रांनो, त्या अठ्ठावीस जोड्यांपैकी प्रत्येक पिढीत दोन दोन जोड्या एकत्र येतात ! पण थांबा, आधी मी मघाच्या एका गोष्टीची फोड करतो– ' सुधाकर ' हे चंद्राचं नाव आम्ही का वर्ज्य केलं ते आता ऐका. "

क्षणभर थांबून चंदर पुढं सांगू लागला. ' तर आमच्या लोकसंख्येला कायमची ठराविक मर्यादा असावी म्हणून चंद्रदेवानं आम्हाला असा वर दिला आहे की, प्रत्येक पिढीत, प्रत्येक जोडप्याला दोनच मुलं व्हावी. थोरला मुलगा, त्याच्या पाठी एका वर्षानं धाकटी मुलगी !—बस्स !—आणि ह्या मुलांना आमच्या कुळाचंच नाव देतात. मात्र मुलगा मोठा म्हणून त्याच्या नावाच्या शेवटी ऱ्हस्व–लहान–इ. किंवा लहान उ. आणि मुलगी लहान म्हणून तिच्या नावाच्या शेवटी दीर्घ–मोठी–ई किंवा मोठा ऊ–'–उदाहरणार्थ–इंदु घराण्यातला मोठा मुलगा इंदु, पाठची मुलगी इंदू !–तसंच शशि–शशी, सुधांशु–सुधांशू, हिमांशु–हिमांशू–पुढं शशांक घराण्यातली मुलं शंकु–शंकू, चंद्रमा घराण्यातली रजनि–रजनी ! ''

" अस्सं !—सुधाकर ह्या चंद्राच्या नावात इकार किंवा उकार नसल्या-मुळं ते तुम्ही गाळलंत तर ? " कवड्यानं म्हटलं.

" पुनः बरोबर !—आणि ह्या आठ नावांची प्रत्येकी एक हजार मिळून एकूण आठ हजार घराणी आहेत ! " चंदरनं सांगितलं.

" पण चंदर, एकाच नावाची एक हजार घराणी ओळखायची कशी हो ? " क्षितींद्र मोहननं कवड्याच्या मनातला प्रश्न विचारला.

" तुमची शंका रास्त आहे. आमच्याकडं आकडेशास्त्राचं माहात्म्य आहे. आपण इंदु घराणं घेऊ या. ह्या घराण्याना इंदु एक, इंदु दोन, अशी इंदु नऊशे नव्याण्णव आणि इंदु हजार पर्यंत नावं दिलेली असतात !—आता पुढील महत्त्वाची माहिती ऐका. एका कुटुंबात एका वेळी तीन पिढ्या म्हणजे मोजकी सहा माणसे असतात !—फक्त मधून, मधून ठराविक वर्षांनी प्रत्येक कुटुंबात आठ माणसं होतात. फक्त दोन वर्षं !—त्या आधीचं एक वर्षभर सात माणसं असतात !—जरा सावकाश सांगतो हं. एका कुटुंबात एका वेळी तीन पिढ्या !—आजी–आजोबा, आई–वडील आणि मुलगा–मुलगी !—तिसऱ्या पिढीतल्या भावंडांची–मुलाच्या विसाव्या वर्षी आणि मुलीच्या एकोणिसाव्या वर्षी—एकाच वेळी लग्नं

होतात !—"

" मुलगी जाते सासरी, तर सून येते घरी. त्यामुळं सहा हा आकडा कायम घरोघरी !—" यमक्यानं सार काढलं.

" शाबास !" चंदर म्हणाला, " मग पुढं ह्या घरी—सासरी—आलेल्या सुनेला एका वर्षानं मुलगा होतो—"

" त्यामुळं माणसं वर्षभर होतात सात !" कवड्या उद्गारला " होय ! त्याच्या पाठीवर एका वर्षानं मुलगी होते—माणसं झाली आठ !—पण ह्या आठव्या माणसाच्या—छोट्या मुलीच्या—पहिल्या वाढदिवसाचा सोहळा साजरा केला म्हणजे त्याच रात्री पहिल्या पिढीतली—आता पणजी, पणजोबा झालेली—आजी आजोबांची जोडी रानात जाऊन समाधी घेते !"

" बापरे !" सन्मित्र उसासले.

" हुं—तुमच्या ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली होती ना, तशी !—त्यामुळं नंतर चौथ्या पिढीतल्या मुलामुलींची लग्न होईतोंवर सहा हा आकडा कायम राहतो !" चंदरनं सांगितलं—

" म्हणजे तुमची ठराविक लोकसंख्या आठ गुणिले एक हजार गुणिले सहा—मिळून अठ्ठेचाळीस हजार असते तर !—आणि एक वर्षभर छप्पन्न हजार आणि नंतर वर्षभर चौसष्ट हजार ! होय ना ?" कवड्यानं म्हटलं.

" होय म्हणजे तुमच्या पुण्यातल्या लोकसंख्येच्या मानानं अठ्ठेचाळीस हजार हा आकडा अगदीच मामुली !—तुमच्या छोट्या शहरातसुद्धा ह्यापेक्षा दुप्पट, तिप्पट लोकसंख्या आहे !—पण आम्ही मुद्दाम ही मर्यादित लोकसंख्या मागून घेतली आहे. त्यामुळं आम्हाला अन्न, वस्त्र, निवारा त्या तिन्हीपैकी कसलीच टंचाई भासत नाही ! आमचा चंद्रलोक सर्व बाबतींत स्वयंपूर्ण आहे ! आम्हाला आयातीची गरज नसल्यानं निर्यातीची आवश्यकता उरत नाही !" चंदर बोलला—

" वा: भाई ! आदर्श लोक आहे तुमचा !" कवड्या उद्गारला.

खरंच छान आहे तुमची ही जम्मत !" परश्यानं म्हटलं.

" नुसती जम्मत नव्हे, परश्या, ही आहे मोठीच करामत ! " यमक्या म्हणाला—

" मला एक शंका आहे, चंदर—विचारू का ? " कवड्यानं प्रश्न केला.

" अवश्य विचारा—शंकानिरसनातूनच ज्ञान वाढतं, कवड्या—" चंदर कौतुकानं स्मित करीत उत्तरला.

आपल्या खवचट स्वभावानुसार ज्ञानेशाला कवड्याचं झालेलं हे कौतुक खटकलं !

फुस्सकन हसत तो तुच्छतेनं बोलला, " अरे, अरे, कवड्या, हा काय म्युनिसिपालटीच्या मराठी शाळेतला वर्ग का आहे ? तरी बरं, हात वरती करून बोलण्याची परवानगी मागितली नाहीस ? डूत ! "

आणि इतर मुलगे हसतील ह्या अपेक्षेने ज्ञानेशानं सर्वांकडं पाहिलं. पण कोणीच हसला नाही,

तसा कवड्या म्हणाला, " ज्ञानेश, वर्गच आहे हा ! चंदरकडून आपल्याला केवढी अजब माहिती मिळाली त्यांच्या चंद्रलोकीची ! "

" बरं, तुमची शंका कोणती ? " ही वादावादी थांबविण्यासाठी चंदरनं म्हटलं.

" म्हणजे असं की, चंदर हे तुमचे खरं नाव नसणार ! तुमच्या आठ घराण्यात ' चंद्रमा ' घराणं आहे. पण त्या घराण्यातल्या मुलाचं नाव चंद्रु होणार !—तेव्हा आमच्याकडं येण्यासाठी म्हणून तुम्ही हे नाव धारण केलंत काय ? " कवड्यानं विचारलं.

" वा: ! योग्य प्रश्न विचारलात ! तुमची शंका रास्त आहे. चंदर हे माझं खरं नाव नाही ! पण ती सर्व माहिती नंतर सांगतो. आता आधी तुम्हा मंडळीचे विनोदाचे नमुने ऐकू या. शरच्चंद्र आणि क्षितींद्रमोहन तर आगळ्या, वेगळ्या पोषाकात आले आहेत. त्यांनी नमुने सादर केले की, त्यांना जरा हुश्श होईल, पोषाकाचा भार थोडा हलका झाल्यागत

वाटेल !—परंतु त्यांच्या आधी मघा ह्या जुळ्या भावांनी तयारी केली होती तेव्हा—ज्ञानेश, आता ह्या दोघांना त्यांचा द्विभाषिक नमुना सांगू द्या." चंदरनं अलगद मूळ विषयावर आणलं सर्वांना—

# पाच

ज्ञानेशानं बऱ्याच वेळानं नकळत उजव्या हातानं घंटी दाबली.

तवश्या आणि परश्या आपापल्या खुर्च्यांतून उठून मध्यभागी उभे राहिले-सुद्धा होते.

तवश्यानं सुरुवात केली. "चंदर आणि सन्मित्रांनो, आता मी जे मराठीत बोलणार..."

"त्याचं मी इंग्रजीत भाषांतर करणार—" परश्यानं वाक्य पूर्ण केलं.

"तयार ?" तवश्याचा मराठी प्रश्न—

"रेडी ?" परश्याचे इंग्रजी भाषांतर.

"होय !"—तवश्या.

"यस !"—परश्या.

"शिवाजी पडला मोठा—" तवश्या.

"Shivaji fell great—" परश्या

"त्यामुळे औरंगजेबाचे त्याच्यापुढे चालेना." तवश्या.

"So Aurangzeb could not walk before him —" परश्या.

"कारण प्रत्येक वेळी—" तवश्या.

"Because every time" परश्या.

"लढाईवर जाताना—" तवश्या.

" War on going " परश्या

" हात जोडीत शिवाजीमहाराज म्हणत असत—" तवश्या

" Hands folding Shivaji king used to say—" परश्या

" कोल्हापूरचे आंबाबाई—" तवश्या.

" Fox city's mango lady—" परश्या.

" तू मला पाव ! " तवश्या—

" You me bread ! " परश्या.

आणि जराही न हसता ते दोघे आपापल्या खुर्च्यांकडं पळाले. सगळे मुलगे थोडेफार हसले. आपल्या पद्धतीनं चंदरनं स्मित केलं आणि यंत्रात बघून आपल्या छोट्या वहीत नोंद केली.

" हं—आता कोणाची पाळी ? " ज्ञानेशानं विचारलं.

" मला वाटतं, ह्या कुतूहलजनक पोषाकातल्या दोघांना आधी संधी द्यावी—" चंदरनं सुचविलं.

ते मानवल्यामुळं शरच्चंद्र उठला. उपरण्याचा शेव खांद्यावर टाकून प्रथमच नेसलेल्या—वडिलांकडून नेसवून घेतलेल्या—धोतराचा सोगा त्यानं झटकला. मग हातातल्या चिपळ्या खुळखुळ वाजविल्या.

आणि घसा खाकरीत तो म्हणाला, " मी आता द्विभाषिक कीर्तनाची झलक दाखविणार आहे "

" अरे वा: ! आधी झालं द्विभाषिक संभाषण—आता होणार द्विभाषिक कीर्तन !—छान, छान ! " यमक्यानं चुटकी वाजवीत म्हटलं.

मध्ये हा व्यत्यय आल्यामुळे पुन: घसा खाकरीत शरच्चंद्रानं जरा नाकात बोलत सुरुवात केली.

" श्री आद्य कीर्तनकार नारद मुनींकी जय !—श्री ज्ञानदेव तुकाराम !

—तर आता आपण त्या सावळ्या श्रीकृष्णाचे—त्या घननीळ नंद-किशोराचे आणखीन नामस्मरण करू या—" चिपळ्यांच्या तालात हात उंचावून नाचत गाऊ लागला शरच्चंद्र—

" गोपाळ कृष्ण, राधाकृष्ण । जय गोपाळ कृष्ण, राधाकृष्ण ।

जय, जय गोपाळ कृष्ण । राधाकृष्ण ।—होऽऽ ! चिपळ्यांचा आवाज बंद करून भजनात जणू सामील झालेल्या असंख्य श्रोत्यांना हातांनी थांबवीत त्यानं पुढे सुरुवात केली—

" तर—जेहेत्ते कालाचे ठायीं द्वापार युगामध्ये श्रीकृष्ण आणखीन गोकुळामध्ये नाना लीला करीत असत !—त्यांनी आपली ती वेणू—ती बासरी—अहाहा ! तो पावा वाजवायला सुरुवात केली की, महाराजा काय होई ?—अहाहा !—त्या बासरीचे ते मृदू, मंजुळ सूर ऐकताना गाई, म्हशींचे जेहेत्ते भान हरपत असे– मग गोकुळातल्या गौळणींची अवस्था काय वर्णावी ?—तर त्या देहभान हरपलेल्या गौळणींचे द्विभाषिक वर्णन आणखीन मी आता आपल्याला ऐकविणार आहे—"

क्षणभर थांबला शरच्चंद्र—मग त्यानं सुळकन चिपळ्या वाजविल्या आणि त्यानं सूर लावला—" आऽऽ—"

अन मग गायला आरंभ केला त्यानं—

" हरि रे तुझी मुरली माधुरी ।
ओ हरी, दाय फ्ल्यूटची माधुरी ।
ओ कृष्णा, युवर फ्ल्यूटची माधुरी
स्कायहुनि सुरवर कम डाऊन झरझर ।
कुंजवनी टेक एंट्री । ओ हरि, युवर फ्ल्यूटची माधुरी ।।
वन गोपी बाथ घेती ।
ओले वेट्ट हेअर गळती ।
तिजसी नॉलेज नसे ।
काजळ शी पुट्स ऑन भाळा ।
कुंकूम शी पेन्सिल्स डोळा ।
माखी फीटना कस्तुरी ।। ओ कृष्णा, युवर फ्ल्यूटची माधुरी ।।
बोला—पुंडलीक वरदा हरी विठ्ठल । श्री ज्ञानदेव तुकाराम । "

कीर्तन संपवून चिपळ्यांसह हात जोडीत शरच्चंद्रानं नमस्कार केला.

सन्मित्र मनापासून हसले. त्यांनी टाळ्यांचा गजर केला.

चंद्रनं स्मित करीत नोंद केली.

तो लिहिण्यात गढला आहे हे पाहून ज्ञानेशानं लगेच घंटी दाबली.

## सहा

" आता कोण ? " अध्यक्षाच्या रुबाबात त्यानं प्रश्न फेकला.

क्षितींद्रमोहनकडं पाहत टरबुज्यानं म्हटलं, " ए, तुझ्या आधी मी आणि चकल्यानं आमचा तो संवाद ऐकविला तर चालेल काय ? "

" चालेल की ! " क्षितींद्रमोहन उत्तरला. त्याला त्या संवादाचं स्वरूप ठाऊक असल्यामुळं तो पटकन हसला.

सुरुवातीआधीच दाद मिळाल्यामुळं चकल्या आणि टरबुज्या खूष झाले.

चकल्या पुढं आला.

" तर बरं का, मंडळी, मी हाये अडानी कुनबी—आनी—" टरबुज्याचा निर्देश करीत " आनिक ह्यो हाये शिकल्याला, सडानी सावकार !-—कसं ?...मी येकलाच चाललो हाये श्येरात—"

खिशातला रुमाल खांद्यावर टाकला चकल्यानं आणि खांदे सैल सोडून उजवा गुडघा वाकवीत बावळटपणाचा आव आणून ' श्येरात '—' शहरात '—जाण्यासाठी तो तिथंच वाटोळा, फिरू लागला.

ह्या ' रस्त्या 'त त्याला टरबुज्या उर्फ सडानी सावकार दिसला. टरबुज्यानं खिशातली गांधी टोपी डोक्यावर चढविली होती.

त्याला बघताच चकल्यानं वाकून नम्रपणं म्हटलं, " रामराम, धनी—"

मग तटकन थांबून चकल्या कुणब्यानं म्हटलं, "पर सावकारदादा, म्या म्हंगतो, निस्तं चालत जान्यापरीस आपुन बोलत, चालत, गोष्टी सांगत सांगत ग्येलो तर?"

"वा: 'छान होईल की'—ठीक!—प्रथम तू गोष्ट सांगतोस का शिदबा?"

छ्या:! पयला मान तुमचा, दादा!—पर—पर...."

"असा घुटमळतोस का? बोल ना काय ते, शिदू—"

"येक अट हाये, धनी—" शिदूनं सांगून टाकलं.

"अट?—अरे वेड्या, हा अटीतटीचा सामना का आहे?—हे कसलं खूळ काढलंस?"

"खूळ न्हवं, दादा! – पर आसं की, दुसऱ्याची गोस्ट अयिकताना व्हय, व्हय म्हनायचं. व्हय न म्हंगता न्हाई म्हनलं तर त्यो गोस्ट आयिकनारा हारला, हं का—"

"एवढंच ना? – ठीक!"

"येवडंच न्हाई, धनी. त्या हारलेल्यानं जितलेल्याला दोन हजार रुप्पे द्याचे! – कसं?"

"बापरे! – दोन हजार रुपये? बरं -- असू दे."

"मंग ठरलं न्हवं?"

"हो, ठरलं!"

"मंग आता आपुन सांगा आपली गोस्ट."

"सांगतो, सांगतो—अं—सांगतो—" गोष्ट आठविण्यासाठी टरबुज्या सावकार डोकं खाजवीत उभा होता. आणि त्याला काही तरी छानदार 'गोष्ट' आठवली—गुदगुल्या झाल्यागत तो हसला. त्यानं मजेत चुटकी वाजवली.

मग आपल्या, पिळला तर दूध निघेल अशा कोवळ्या ओठांवर नसलेल्या मिशीला पीळ दिल्याचा आविर्भाव करीत सावकार म्हणाला, "ठीक!--

पण शिदू, अट विसरू नकोस, बेट्या."

"अवो, म्या घातल्याली अट ती! विसरंन कसा जी?" शिदूनं बावळट चर्येनं म्हटलं.

आणि मधूनच वाटोळं फिरत, मधून थांबत त्या दोघांचं संवादात्मक कथाकथन सुरू झालं!—

"तर काय झालं, शिदू," सावकारानं म्हटलं, "तुझा आजा माझ्या आजोबाकडं नौकरीला होता! पडलं, अडलं सगळं काम तो करायचा—ओझ्याचा बैलच म्हणा ना!"

"व्हय, धनी!" शिदूनं होकार दिला.

"पुढं तुझा बाप!—तो माझ्या वडिलांकडं अशीच चाकरी करीत होता. तोसुद्धा तुझ्या आज्यासारखाच बिनडोक!"

"खरं हाये, सावकार!" शिदूनं मान डोलवीत उत्तर दिलं.

मग थोडं वेगळं आठविल्यागत सावकार खळखळून हसला. अन म्हणाला, "अरे, काय सांगू तुला गम्मत, शिदू?—मी आणि माझा भाऊ तुझ्या बापाच्या पाठीवर बसून चक्क घोडा, घोडा करीत असू. चाबकानं त्याला मारीत हातापायांवर पळवीत असू—ऐकलंस?—अशी मज्जा!"

"व्हय जी! आगदी खरं जी!"

"हं!— पुढं तू! वास्तविक आधीच्या दोन पिढ्यांप्रमाणं तू सुद्धा आमच्या इथं राबायला हवं होतं!—पण—तुझी भलतीच मिजास! मारवाड्या-कडून कर्ज काढून झालं तरी स्वतःचं शेत स्वतः कसणार ही तुझी घमेंड!"

"होय, दादा!" शिदूनं चटकन होकार दिला.

"तुझ्या ह्या घमेंडीपायी तू कर्जात बुडतो आहेस, गाढवा!" सावकार सात्त्विक संतापानं तणतणला.

"खरं हाये, धनी!" शिदू संपूर्ण लाचारीनं पुटपुटला.

"पण तुझ्या बापसापेक्षादेखील अडाणी, बिनडोक पडलास तू!—

तुझी जित्याची खोड का जाणाराहे ?– आता चाललास ना शहरात मारवाड्याकडं कर्जाचा हप्ता भरायला ? ”

“ व्हय जी, धनी. ” उगीचच रामराम करीत शिदू बोलला.

“ मग मरा लेको, त्या मारवाड्याच्या कर्जात ! ” सावकारानं शापवाणी उच्चारली.

“ व्हय, दादा ! ” शिदूनं तीही शिरोधार्य मानली.

मघापासून टरबुज्या ‘ सावकारा’चा फुगरा, ऐटबाज आवाज काढीत होता.

आताही त्याच आवाजात तो म्हणाला, “ ठीक !–संपली माझी गोष्ट ! आता तू कर सुरुवात—”

“ करतो, जी ! ” चकल्यानं म्हटलं.

मघापासून तो अधून मधून ‘ तंबाकू खात ’ होता. आता त्या ‘तमाकू’ ची पिंक रस्त्याच्या कडेला थुंकल्याचा त्यानं शिदूनं–अभिनय केला. आणि गडगडून घसा खाकरला.

मग बावळेपणाचा अधिकच आव आणीत त्यानं आरंभ केला.

“ आइका, धनी. पर अट ध्येनामंदी ठिवा, सावकार. ”

“ ठेवतो, बाबा, ठेवतो. तुझ्यासारखा बिनडोक नाही बरं मी ! ” सावकार उद्गारला.

पण त्यानं स्वतःची ‘ गोष्ट ’ संपल्याची कबुली दिली होती. त्यामुळं त्याचा प्रत्येक टोमणा झेलण्याची शिदूला आता गरज नव्हती.

त्यानं लगेच सुरुवात केली.

“ तर काय जालं, सावकार, तुम्ही सांगिटल्यापरमानं माजे आजोबा तुमच्या आजाकडं कामाला व्हते !–व्हते का ? ”

शिदूनं अलगद केलेली, सावकारानं उच्चारलेल्या आजोबा आणि आजा ह्या नावांची अदलाबदल ऐकून मुलांना हसू आलं. पण सर्वांनी लगेच ते दाबलं.

तेवढे पाच, दहा क्षण थांबून सावकार हो उत्तरला, " य, होते शिदबा—"

" पर मोटंपनाच्या, शिरीमंतीच्या मिजाशीपायी तुमच्या आज्ज्यानं समदा पैका गमावला !—आता जाली का पंचाइत !—त्यातून त्येंची बायकू—तुमची आज्जी, गा—डागडागिन्यानी कुचकुचीत भरली व्हती—पर येकबी अंगावरला डाग उतरून दीना, बाई ! कसं ? "

" खरं आहे, शिदू—"

" अवो, माजी आज्जी अडानी हुती म्हनं ! पर तिनं तुमच्या आज्जीला किती समजून सांगिटलं. ती म्हंगाली, ' अवो सावकारीनबाई, गल्यातलं मंगलसुत्तर आनिक कपालीचं कुक्कु हेच आपले सोबाग्याचे डागिने ! त्ये कुशल व्हावे म्हणून द्या की सावकारास्नी तुमचे सोन्याचे ह्ये डागिने—'—पर छ्या: ! तुमच्या आज्जीला पटना वो—डागिन्यांचा मोट्टा सोस व्हता तिला ! "

" हं— खरं आहे, शिदू—" सावकाराचा त्रासिक होकार आला.

" मंग काय जालं—तुमच्या आज्जानं माज्या आज्जोबाकडं उसना पैका मागन्यापायी हात पसरला !— आता येवडा मोट्टा सावकार हात पसरतुया—न्हाई कसं म्हनावं, जी ? म्हनून माज्या आजोबानं त्या म्हाताऱ्याची नड भागिवली ! त्यास्नी हातउसना पैका दिला !—कसं ? " शिदूचा जणू भाबडा सवाल.

" हं. बरोबर, शिद्या—" सावकाराचा रागीट जबाब.

" फुडं—तुमचा बाप !—अरारारा ! त्योबी तस्साच उधळ्या ! माज्या आजोबाकडनं घेतल्याल्या कर्जात बापसानं त्याला डुबत ठिवलावता तरी सुदीक मिशीला तूप लाऊन गावामंदी हिंडायचा तुमचा बाप ! मंग माज्या वडलांच्या हयातीमंदी तुमचा बापूस त्ये जुनं कर्ज कुटला फेडनार हुता ? —सांगायचं म्हंजे तुमच्या बापानं त्ये कर्ज फ्येडलं न्हाई !—कसं ? "

" काय ?—अं— हं—होय—शिदऱ्या—"

" आनी तुमी वी त्ये कर्ज अजुनी फ्येडलं न्हाई ?—"

" होय, बाबा ! "

" तर—" वाटोळं फिरत गुजराथी पगडी घातलेल्या क्षितींद्रमोहन-समोर उभा राहून शिदू म्हणाला, " आरत्तिच्चा !—सावकार, वाट कंदी सरली ये उमागलंच न्हाई पगा. आपुन शेरातल्या ह्या मारवाड्याकडं पोचलो की !—राम, राम, मारवाडीदादानु—"

" जय गोपाळ ! " क्षितींद्र आधी पढविल्यासारखा उत्तरला, " काय शिदूराव करजा तुमी कंदी फेडनार ?—किती रुपयाचा हप्ता आनला आज ? "

" हप्ता कशापायी, दादा ? येवा रकमेनं तुमचं समदं कर्ज फेडून टाकनार हाये ह्यो गब्रू ! " शिदूनं म्हटलं, मग टरबुज्याकडं वळत तो बोलला, " सावकार, तुमच्या बापजाद्यांचं त्ये कर्ज तुमी अजुनी फेडल्यालं न्हाई !—खरं ना, धनी ? "

" अं—हं—होय—" सावकार चुटपुटला.

" तर—बरं का, सावकार, तुमच्या आज्जानं घेतल्यालं त्ये कर्ज मुदली दोन हजारांचं हुतं ! त्यावरतं याज ध्यायला म्या काई सावकार न्हाई !—तवा तुमच्या आज्जानं माज्या आजोबाकडून दोन हज्जार रुपये कर्ज घेतले वते ह्ये कबूल हाये ना तुमास्नी ? "

" हे—अगदी—भलतंच—म्हणजे—अं—अं—हो—कबूल आहे लेका ! " दात, ओठ खात सावकार पुटपुटला—

तसा शिदू चुटकी वाजवून म्हणाला, " बेश !—तर तेवडे दोन हजार रुपये ह्या मारवाडीदादास्नी दिऊन टाका कसे, धनी—म्हंजी—तुमचं, आमचं तीन पिड्यांचं कर्ज फिटंल अनिक ह्या मारवाड्याकडलं माझं नेमकं दोन हजारांचं कर्जबी फिटंल !—कसं ?—अन्नाडी, बिनडोक मानसाचा ह्यो हिशेब, सावकार—"

टरबुज्या सावकारानं वैतागल्याचा, गुद्दा उगारल्याचा अभिनय केला.

मग खिशातून पैसे काढून निमूट क्षितींद्राला ते रागारागानं दिल्याचा आविर्भाव केला आणि तो हात झटकीत मटकन खाली बसला.

मग पटकन उठून तो आणि चकल्या आपापल्या खुर्चीकडं पोचले.

मुलांनी हसून टाळ्या पिटल्या.

चंदरनं स्मित करीत वहीमध्ये यंत्रातली नोंद टिपली—

# सात

ज्ञानेश पुन: घंटी वाजविणार होता. एवढ्यात कवड्या उभा राहिला.

" जरा थांबा, ज्ञानेश—मघा मी चंदरना प्रश्न विचारला होता. त्या-बद्दल कुतूहल वाटून राहिलंय मला. चंदर...."

कवड्याचं वाक्य तोडीत ज्ञानेश म्हणाला, " कवड्या, आता आपण लहान मुलगे का आहोत ?—आपण योग्य रीतिरिवाज, मॅनर्स पाळायला हव्यात. तू आता मला ' जरा थांब ' असं म्हणालास. त्याऐवजी ' सॉरी ' किंवा ' एक्स्क्यूज मी—' जरा थांब, असं तू म्हणायला हवं होतंस ! "

ह्यावर कवड्यानं काही उत्तर देण्याआधी परस्पर ' सोनारा 'नं कान टोचले ज्ञानेशाचे.

" आपलं सौम्य स्मित करीत चंदर बोलला, " असं घेडगुजरी का बोलायचं ?—जर तुम्हाला माफीची अपेक्षा असेल, ज्ञानेश, तर ' माफ कर हं ' हे शुद्ध मराठी वाक्य नाही का चालणार ?....तुम्हीच आता म्हटलंत की, तुम्ही लहान मुलगे नाहीयेत. मग तुमच्यासारख्या जाणत्या मुलांनी आपल्या मातृभाषेचा अभिमान नको का बाळगायला ?—अं ? "

" ते खरं ! पण इंग्रजी भाषा चहूकडं आवश्यक असतीय ना ?—

त्यासाठी इंग्रजी बोलण्याची प्रॅक्टिस—अं—सवय करणं योग्य नाही का ?" ज्ञानेशानं आपल्या मतानं छानदार मुद्दा मांडला.

पण चंदर लगेच म्हणाला, "मग त्यासाठी एकमेकांशी संपूर्ण इंग्रजीत बोला. असा मध्येच एखादा इंग्रजी शब्द वापरून का इंग्रजी बोलण्याची सवय होऊ शकणार आहे ?—वाकी' मघापासून दोन द्विभाषिक किस्से मी ऐकले—क्षितींद्रमोहनचा तर पोषाकही घेडगुजरी दिसतो आहे. तेव्हा तुम्हा मराठी माणसांना कपडे, भाषा—दोन्ही घेडगुजरी आवडत असणार !"

"छान अहेर दिलात, चंदर !—मी हे बोलतो असतो तर उगीचच आपली टर उडवतोय म्हणून अध्यक्षमहाशय केवढे उखडले असते ! रागानं तीन ताड उडाले असते !" टरबुज्यानं म्हटलं—

"बरं, बरं !—तुझा अहेरही मिळाला म्हटलं !—हं—कवड्या, तुझं कुतूहल पूर्ण करून घे आता——" ज्ञानेशानं उदार मनानं परवानगी दिली——

"आभार !" कवड्या मुद्दाम आपल्यालाही मॅनर्स पाळणं कळतं हे दाखविण्यासाठी म्हणाला.

मग तो चंदरला पुढं म्हणाला, "तुमचं चंद्रलोकीचं खरं नाव सांगता ना ?"

"सांगतो की-माझं खरं नाव शशि पाचशे एक असं आहे——" चंदर उत्तरला.

"अस्सं !" कवड्यानं म्हटलं, "म्हणजे 'शशी पाचशे एक' हे तुमच्या घराण्याचं नाव !....तुम्ही ह्या पिढीतला वडील मुलगा म्हणून तुमचं नाव 'शशि पाचशे एक'...आणि तुमच्या पाठच्या बहिणीचं नाव 'शशी पाचशे एक' !...असंच ना ?"

"बरोबर !..." चंदर उद्गारला.

"पण तुमच्याचप्रमाणं तुमच्या वडिलांचं आणि तुमच्या आजोबांचं

नावसुद्धा ' शशि पाचशे एक ' हेच असणार ना ? " कवड्यानं मनातली शंका बोलून दाखवली.

तसा चंदर खूष झाला.

" शाबास ! " तो म्हणाला, " तो म्हणाला, " योग्य निष्कर्ष काढलात तुम्ही !...माझ्या वडिलांचं आणि आजोबांचं नावही हेच आहे. पण ह्यावर आमच्या पूर्वजांनी छानदार तोड काढली आहे. आमच्या घराण्यातला मुलगा शशि पाचशे एक, मुलगी शशी पाचशे एक... वडील शशिपिता पाचशे एक. आई शशीमाता पाचशे एक....आजोबा शशिमह पाचशे एक. आई शशीमही पाचशे एक ! "

चंदरनं केलेली ही फोड समजल्यागत कवड्या, चकल्या, टरबुज्या, यमक्या आणि शरश्चंद्र ह्या पाच जणांनी माना डोलविल्या.

तवश्या आणि परश्या जुळे भाऊ असल्यामुळे त्यांच्या वाट्याला बहुधा अर्धा अर्धा मेंदू आला असणार. त्यांना उमज पडला नाही. क्षितींद्र आपल्या धेडगुजरी पोषाकावरून सफाईचा हात फिरविण्यात गुंतला असल्यानं त्यानं धड ऐकलंच नाही.

ज्ञानेशानं ऐकलं पण त्याला बोध झाला नाही. आपल्यांपैकी पाच जणांनी माना डोलविल्या, त्यांना बोध झाला. इथं त्यांचं लक्षच नव्हतं.

त्यामुळं त्यानं तटकन चंदरला विचारलं, " हे मह, मही म्हणजे काय बुवा ? "

" हत्तेच्या ! " चकल्या म्हणाला, " अरे, पितामह आणि पितामही आजोबा आणि आजी—ह्या संस्कृत नावाचं ते संक्षिप्त रूप असणार !— होय ना चंदर ? "

" होय ! " चंदर उत्तरला आणि त्यानं हळूच म्हटलं, " तुम्ही अन्नाडी कुनबी असून संस्कृतचं ज्ञान आहे तुम्हाला ? "

तसे ज्ञानेशखेरीज आठ सन्मित्र गमतीने हसले.

मग चन्दर ज्ञानेशाला म्हणाला, " शाळेत तुम्ही संस्कृत घेतलंय ना ?

की फ्रेंच घेतलंय ? "

" अं—छे: ! संस्कृत घेतलंय." ज्ञानेश पुटपुटला.

लगेच टरबुज्यानं विचारलं, " ज्ञानेशाला मातृभाषेचे फारसं अगत्य नाही असं वाटलं म्हणून त्यानं संस्कृतऐवजी फ्रेंच घेतलं असेल ही शंका आली ना तुम्हाला, चन्दर ? "

" बोलले ! " ज्ञानेश वतवतला, " टरबुज्या तू विचार न करता केवळ दुसऱ्याची टर उडवायची म्हणून विनोदी बोलतोस हं एकेकदा !—बाबारे, जर फॉरेनला शिकण्यासाठी जायचे असेल तर इंग्रजी भाषेवर प्रभुत्व नको का असायला ? "

" पण ते प्रभुत्व आणण्याकरता चंदर मघा म्हणाले तसं इंग्रजीतच बोलत जा की, वाटल्यास इंग्रजीची शिकवणी ठेव. चन्दरचं बोलणं आपल्याला पटलं बुवा ! ह्यापुढं मी मराठीत बोलताना इंग्रजी शब्द घुसडणार नाही ! "

शरच्चंद्रानं म्हटलं—

" ज्ञानेश, मी एक प्रश्न विचारू का तुम्हाला ? " चन्दरनं मुद्दाम कवड्याच्या ढंगात म्हटलं. हे ओळखल्यामुळे साभार स्मित करीत कवड्यानं त्याच्याकडं पाहिलं.

" वा: वा: !—विचारा की—" ज्ञानेश खुषीत उत्तरला—त्यांच्या प्रश्नाचे उत्तर फक्त आपणच देऊ शकू असं चंदरना वाटतंय ह्या कल्पनेनं पठ्ठ्या पटकन ' मुडा 'त आला.

" म्हणजे असं की, शिक्षणासाठी परदेशी तुमच्या शब्दात, फॉरेनला जाण्याचं अजुनी एवढं अगत्य तुम्हा भारतीयांना का बरं वाटतं ?—तुमच्या देशात आता सर्व विषयांचे शिक्षण मिळण्याची सोय झाली आहे असं आम्ही चंद्रलोकात ऐकलंय !—मग तुम्ही इथंच शक्य तेवढं शिक्षण का घेत नाही ?—दुसरा माझा असा दावा आहे की, भारतातले अनेक बुद्धिवंत, होतकरू तरुण इंग्लंडला, अमेरिकेला जातात. आणि तिथल्या

मोठाल्या पगारांच्या आमिषाला भुलतात. तिकडल्या सुखसोयींना लोभावतात आणि लग्न करून कायमचे तिथंच राहतात!—आमच्या चंद्रलोकातल्या विचारसरणीनुसार हा चक्क मातृभूमीचा द्रोह आहे!—तुम्हाला तेवढीच खुमखुमी असली आणि तुमच्या आवडीचे शिक्षण तुमच्या मायभूमीमध्ये मिळू शकत नाही अशी तुमची खात्री असली तर तुम्ही ते शिक्षण मिळविण्यासाठी परदेशाला जा—पण ते शिक्षण घेतलंत की, स्वदेशी परत या. तुमच्या शिक्षणाचा, तुमच्या बुद्धिमत्तेचा फायदा तुमच्या मायभूमीला मिळायला नको काय?—म्हणून म्हणतो, फॉरेनला जाण्याचा मोह आवरा." चंदरनं मनापासून हे लांबलचक भाषण केलं.

"पण वडिलाकडं पैसा असला, ते आवडीनं पाठवीत असले तरी फॉ–परदेशी जाऊ नये?" ज्ञानेशानं जरा वाईट तोंडानं विचारलं. तो 'बडे बापका बेटा' होता ना!

"त्यापेक्षा स्वत:च्या हिम्मतीवर, स्कॉलरशिप मिळवून परदेशी जाणं अधिक भूषणास्पद!– मात्र तुम्ही कसेही गेलात तरी मायभूमीला अवश्य परत या. आपल्या मातृभूमीचे ऋण फेडण्यासाठी या." चंदरनं म्हटलं.

त्यावर कवड्या म्हणाला, "अहा! चंदर किती बिनमोल बोल आहेत हे तुमचे! दोस्तानो, चन्दरचे हे बोल कधी विसरू नका—चंदर, तुम्ही आमच्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव ऐकलं असेलच!–"

"होय ना! त्यांचं काव्यसुद्धा वाचलं आहे मी." चंदर बोलला.

"मला वाटलंच होतं तसं!–तर 'सागरा प्राण तळमळला' ह्या त्यांच्या उदात्त कवितेत 'ने मजसी मातृभूमीला' अशी त्यांनी कळवळून सागराला विनंती केली आहे!—पण ह्या काव्याच्या मागं असलेली मातृभूमीविषयीची ओढ आम्ही विसरतो. बस्स!– शरच्चंद्रानं मघा मराठी बोलताना इंग्रजी शब्द न घुसडण्याचा संकल्प सोडला. मी मातृभूमीशी एकनिष्ठ राहण्याचा संकल्प सोडतो!—समजा, स्कॉलरशिप मिळून परदेशी शिक्षणासाठी जाण्याची संधी मला गवसली तरी शिक्षण घेताच

मी मायभूमीला माघारी येईन आणि मायभूमीसाठी त्या शिक्षणाचा विनियोग करीन-- " कवड्या मनापासून बोलला.

तसा यमक्या विलक्षण भारावला. आपल्या यमकबद्ध, कृत्रिम शैलीचा विसर पडून तो इतरांसारखं बोलत पटकन म्हणाला,

" सन्मित्रांनो, मघा चंदरनी इतका आवर्जून आपल्याला लाखमोलाचा उपदेश केला !—वस्तुत: त्यांचं ते बोलणं संपताच आपण टाळ्यांचा कडकडाट करायला हवा होता !—पण कवड्यानं म्हटल्याप्रमाणं त्यांचे ते बिनमोल बोल मनावर ठसविण्यातच आपण बहुधा गढलो होतो ! त्यामुळं चंदरच्या त्या बोलांना दाद देण्याचं राहूनच गेलं !—आता आपल्या कवड्यानं त्यांच्या शब्दांचा अर्थ आणखी स्पष्ट केला ! — तेव्हा आपण सर्वजण चंदरचे आभार मानण्यासाठी टाळ्यांचा गजर करू या—"

आणि दुसऱ्याच क्षणी त्या आठजणानी मोठ्या आवडीनं टाळ्या दिल्या. ज्ञानेशानं आपला हुळहुळता पंजा संभाळून टाळ्यांची थोडी भर घातली.

" मी तुमच्या ह्या गुणग्राहकतेबद्दल तुमचं मन:पूर्वक कौतुक करतो आणि आभार मानतो !—बरं, आमच्या चंद्रलोकाबद्दल आणखी काही माहिती विचारायची आहे का कोणाला ? " चंदरनं म्हटलं.

" होय, तुमच्या इथं तुम्ही कोणत्या भाषेत बोलता, चंदर ? " क्षितींद्रानं आता आपल्याच पोषाकाची तुस्त संभाळण्याचा मोह दूर सारला बहुधा. त्यामुळं सर्वांच्याच मनी घोळणारा हा प्रश्न त्यानं विचारून टाकला.

" ह्या प्रश्नाची मघापासून मी अपेक्षा करीत होतो– " चंदरनं स्मित करीत म्हटलं, " आम्ही तुमच्या इथल्या वेदकालीन संस्कृत भाषेत बोलतो."

" अरे वा: ! " कवड्या कौतुकानं, चक्क आदरानं उद्गारला.

" म्हणजे शाळेत संस्कृत ही तुमची मातृभाषा असणार तर ? " चकल्यानं अक्कल लढविली.



१५८८ ३५५

" होय !– मात्र प्राथमिक शाळेत लहान मुलगे आणि मुली प्राकृतात बोलतात. घरीसुद्धा प्राकृतच बोलतात ती. माध्यमिक शाळेत गेल्यावर ती संस्कृत शिकतात. प्राकृत भाषेबद्दल ऐकलंय का तुम्ही ? " चंदरनं नेहमी-प्रमाणे सार्वजनिक प्रश्न केला.

त्याची नजर मात्र कवड्याकडं वळली होती—

" थोडंसं ऐकलंय मी. संस्कृत नाटकातली स्त्रीपात्रं प्राकृत भाषेत बोलतात–" कवड्या म्हणाला.

" बरोबर ! संस्कृत भाषेपेक्षा ती सोपी असते. म्हणून नाटकात प्राकृत भाषा स्त्रियांच्या आणि मुलांच्या तोंडी घातली आहे. तुमच्या कालिदासानं शाकुंतल नाटकात स्त्रियांसाठी प्राकृतच वापरली आहे. " चंदरनं म्हटलं.

" होय तेच मी वाचलं होतं. माझ्या वडील भावाला अकरावीला ' संस्कृत गद्य पद्य वेचे ' हे पुस्तक होते. त्यात ' आर्यपुत्र ' ह्या संस्कृत शब्दाचा ' अज्जउत्त ' हा प्राकृत प्रतिशब्द मी वाचलेला माझ्या लक्षात राहिला आहे. ' आर्यपुत्र ' ह्या संस्कृत शब्दापेक्षा ' अज्जउत्त ' हा त्याच अर्थाचा शब्द नक्कीच सोपा आहे ! " कवड्या बोलला.

" बरं, आणखी कोणकोणते विषय शिकता तुम्ही ? " परश्यानं प्रथमच प्रश्न केला.

" आं ? " चंदर म्हणाला, " तुम्ही आणि तवश्यानं एका सुरात कसा विचारला नाही हा प्रश्न ? "

" नावाच्या आद्याक्षराप्रमाणं एका सलग रांगेत तवश्या आणि परश्या शेजारी बसू शकले असते. नि मग दोघांनी एका सुरात जुळा प्रश्न केला असता ! पण आम्ही चौघा, चौघांच्या दोन रांगा केल्यात ना ?–त्यामुळं शेजारी न येता हे दोघे तिरपे कर्ण रेषेत बसले आहेत. म्हणून असं घडलं असावं ! " परश्याच्या शेजारी बसलेल्या यमक्यानं तर्क-की-तर्कट रचला–रचलं—

" शक्य आहे हे ! " चंदरनं म्हटलं, " पण चंद्रलोकीच्या शिक्षण-

पद्धतीबद्दल मी जरा विस्तारानं सांगावं म्हणतोय. चालेल ना!"

"अवश्य! अवश्य!" आठही सन्मित्र इतक्या मोठ्यांदा आणि इतक्या वेळा हेच बोलले की, ज्ञानेशाला घंटी वाजविण्याची चांगली संधी सापडली.

त्या गोंगाटानं की, मघा मस्तकात पोचलेल्या तळहाताच्या कळीनं— कशानं कोण जाणे, पण ज्ञानेश बावचळला थोडा—

घंटी बडवीत तो ओरडला—"लायसन्स—अं—सा—ला—सायलन्स!"

अन् मग मित्रांनी—कारण ह्या क्षणी ज्ञानेशाला ते सन्मित्र वाटत नव्हते—हसण्याचा कल्लोळ केला.

चंदरनं आपला हात थोडासा वर केला—तसे सगळे पोरगे गप्प झाले.

आपल्या 'पडलो तरी नाक वर' ह्या स्वभावानुसार ज्ञानेश पटकन ओरडला—"पाहा जरा. मी घंटी वाजविताच तुम्ही गप्प राहिला असता तर पाहुण्यांनी तुम्हाला गोंधळ थांबविण्याची सूचना देण्याची वेळ आली नसती!"

"पण चूक तुझी होती, ज्ञानेशा—तू बोलताना चुकलास—त्यामुळं आम्हाला साहजिकच हसू कोसळलं!" टरबुज्यानं म्हटलं.

चंदरनं आतासुद्धा वेळ सावरली.

तो म्हणाला, "माझी अशी सूचना आहे की, आमच्या लोकाबद्दलची सविस्तर माहिती मी सांगण्यासाठी क्षितींद्रमोहनला त्यांची पाळी द्यावी. त्यांचा विनोदी नमुना सांगून झाला की, ते डोक्यावरली गुजराथी पगडी तरी उतरू शकतील—कीर्तनकार शरच्चंद्रांनी आपली पुणेरी पगडी हळूच खुर्चीखाली ठेवली आहे."

हसण्याची बारीकशी लाट उमटून गेली.

लगेच ज्ञानेशनं घंटी वाजविली आणि क्षितींद्रमोहनला पुढं येण्यास खुणावलं.

# आठ

नकळत मघापासून चाललेली कपड्यांची साफसफाई पुन्हा एकदा केली क्षितींद्रानं—आणि पायातला पुणेरी लाल जोडा चटचट वाजवीत तो पुढं आला.

" चंदर आणि सन्मित्रांनो, " तो म्हणाला, " माझ्या पोषाकामुळं मी कोण आहे ह्याबद्दल तुम्हाला साहजिकच थोडंफार कुतूहल वाटून राहिलं असणार !—तर माझं नाव आधी सांगून टाकतो मी. ऐक—माझं नाव आहे गु—म—यू—बं—द ?—नाही ना उमगत ?—मग ते कवनात सांगतो हं मी—ऐका मंडळी—"

गाताना ज्या वेषभूषेचा उल्लेख असेल तिथं हातानं स्पर्श करीत क्षितींद्रानं सुरुवात केली-—

" गुजराथी पगडी । माझी गुजराथी पगडी ।
मद्रासी उप्परण्याची घडी । माझी उप्परण्याची घडी ।
यू. पी. वाली शेरवानी । शेरवानी ही यू. पी. वाली ।
बंगाली ही धोती माझी । धोतर माझे हे बंगाली ।
दक्षिणी जोडा पायामध्ये लाल, लालबुंद ।
जुळवुनि आद्याक्षरे पाच हो नाव गुमयूबंद ।
ऐका—नाव गु—म—यू—बं—द ।

मुलांनी हसून टाळ्या वाजविल्या—क्षितींद्रमोहन आपल्या खुर्चीकडं गेला आणि बसता, बसता त्यानं डोक्यावरली गुजराथी पगडी काढून खुर्चीखाली ठेवली.

तसे चंदरचे शब्द आठवून मुलांना पुनः हसू फुटलं.

स्मित करीत चंदरनं वहीत नोंद केली.

एवढ्यात क्षितींद्राच्या समोरच्या खुर्चीत बसलेला तवश्या पटकन म्हणाला, "दोस्तांनो, गु—म—यू—बं—द आता म—यू ..बं—द झाला ! गुजराथी पगडी गेली !"

पुनः हसण्याची लाट उसळली.

ती ओसरताच कवड्यानं म्हटलं, "चंदर, मघा एकटा परश्या एक वाक्य बोलला-—आता एकटा तवश्या दोन वाक्यं बोलला !-—तवश्या, तू छान बोललास आणि तू ते बोललास हे छान झालं !—म्हणजे असं की, पाठ केलेलंच तू बोलू शकतोस असा चंदरचा समज झाला असला तर तो आयताच दूर झाला !"

लगेच अध्यक्षानं घंटीकडं हात नेला.

ते बघताच चकल्या कवड्याच्या कानात काही तरी बोलला.

घंटी वाजवीत ज्ञानेश म्हणाला, "चकल्या, चार चौघांत असं गुप्त बोलणं वाईट दिसतं !—बॅड मॅनर्स—अं—वाईट री—"

"त्यापेक्षा रीतिभातीचा अभाव असं म्हण, ज्ञानेशा—अगदी ह्या तवश्या, परश्यांनी केलं तसं तंतोतंत भाषांतर कशाला करतोस ?" कवड्यानं म्हटलं.

ज्ञानेशानं आपलं वाक्य तिथंच सोडलं. अन तो ऐटीत बोलला, "सन्मित्रांनो, तवश्या कशी मोजकी दोन वाक्यं बोलला ! नाही तर तुम्ही काहीजण उगीचच पचपच करता सतत—

आता न राहवून कवड्यानं चकल्याला टाळी दिली.

मग कवड्या म्हणाला, "चंदर, चारचौघांत एखाद्याच्या कानात इतरांना कळू नये असं बोलणं गैर आहे हे ठाऊक आहे आम्हाला पण चकल्या जे बोलला ते नंतर सर्वांना सांगण्याबद्दल त्यानं मला त्याचवेळी बजावलं होतं !—म्हणजे आमच्या हातून शिष्टाचाराचा काही क्षणापुरताच

भंग झाला !—तरीही त्याबद्दल आम्ही तुमची क्षमा मागतो—"

"छे: छे: ! माझ्या मतानं तो शिष्टाचाराचा भंग क्षम्य होता. मग क्षमा मागण्याचा प्रश्नच कुठं येतोय ? " चंदरनं हळूच पुढं विचारलं,

"कवड्या, चकल्यानं जे तुमच्या कानात सांगितलं ते चारचौघाना सांगणं तुम्हाला जरा अवघड वाटतंय ना ?

"हो. तुम्ही कसं अचूक ओळखलंत हे ?—मनकवडेपणाचा गुण-सुद्धा तुम्हा चंद्रवासियांच्या अंगी बाणलेला असतो की काय ?—अं—मग—चकल्यानं माझ्या कानात काय सांगितलं हे तुम्ही ओळखलंच असेल ना चंदर ? कवड्यानं म्हटलं.

चंदरनं आपल्या विशिष्ट, छानदार पद्धतीनं मान होकारात्मक डोलविली.

"तसा कवड्या किंचित हसत म्हणाला, "मग मी ते चारचौघांत सांगू का ? "

"अध्यक्षांची परवानगी घेऊन सांगा—" चंदरनं स्मित करीत सल्ला दिला—

तसा गालातल्या गालात हसत कवड्या पुटपुटला, "खरंच की !—ही मस्त सूचना दिलीत हं !—"

मग त्यानं उभं राहत ज्ञानेशाला म्हटलं, "ज्ञानेश—अध्यक्षमहाशय, मघा चकल्या जे माझ्या कानात बोलला आणि जे तुला अशिष्ट वाटलं ते मी आता उघड सांगू का ? "

"अवश्य सांग. आणि ह्यापुढं तुम्ही कोणीच असा शिष्टपणा—म्हणजे —अशिष्टपणा-—करू नका. हं-—बोल, कवड्या—" ज्ञानेशनं आपल्या अधिकारात परवानगी दिली.

"चकल्या माझ्या कानात पुटपुटला की, आता लगेच तवश्याच्या मोजक्या बोलण्यावरून ज्ञानेश आपल्याला अध्यक्षाच्या रुबाबात उपदेशाची मात्रा चाटवील !-—तो म्हणेल की, 'सन्मित्रांनो, तवश्या कशी मोजकी दोन वाक्यं बोलला ! नाही तर तुम्ही काहीजणं उगीचच पचपच करता

सतत '—आणि तू नेमकं असं बोललास, ज्ञानेशा त्यामुळं मी न राहवून चकल्याला टाळी दिली ! "

विचारा ज्ञानेश ! आपण उगीचच कवड्याला हे सांगण्याची परवानगी दिली असं झालं त्याला. हुं: !—ह्या चंदरनं आपली परवानगी मागण्याचा सल्ला दिला मारे !—आणि कवड्यानं त्याला मनकवडा ठरविला !—म्हणजे कवड्या काय बोलणार आहे हे ह्या मनकवड्या चंदरला ठाऊक होतं तर !—

ज्ञानेश चंदरवर उखडला मनोमन. पण तसं स्पष्ट कसं बोलणार ?

त्यामुळं चकल्यावर घसरत तो वतवतला, " चकल्या, तू सुद्धा चंदरसारखा मनकवडा आहेस तर ! म्हणजे मनकवडेपणाचा हा गुण चंद्रलोकाचीच मिरासदारी नाही म्हणायची ! "

" अर्थातच नाही, ज्ञानेश ! आणि मी तसा दावा केला नव्हता. मन-कवडेपणा प्रयत्नानं, जिद्दीनं कोणालाही साध्य होऊ शकतो. " चंदर उत्तरला.

" हं—हे चकल्यामुळं कळलंच आता !—चकल्या, तू टरबुज्याच्या शेजारी बसतोस त्याचा परिणाम हा !—बरं का चंदर, " आपले शब्द त्याला टोचले असतील ही पश्चात बुद्धी आता सुचल्यानं ज्ञानेश पुढं म्हणाला, " माझी आजी एक म्हण घोळवीत असे. गमतीची आहे ती !"

आणि त्या गमतीच्या आठवणीनं ज्ञानेशनं हसून घेतलं.

हसू सांसर्गिक असतं. दुसऱ्याला हसताना पाहून आपल्यालाही हसू येतं. पण ह्या आठही सन्मित्रांचा ज्ञानेशावर जरा राग होता. त्याचा तोरा त्याला आवडत नसे. त्यामुळं एकमेकाना तसं न सांगताही ते सगळे जराही हसले नाहीत.

चंदर तर काय, हसणंच विसरलं जाणार अशी परिस्थिती झालेल्या चंद्रलोकातून आलेला !—आता ऐकलेले विनोदी नमुने सन्मित्रांनी हशा, टाळ्यांनी झेलले. पण चंदर मोजकं स्मित करीत होता.

त्यातून ज्ञानेशानं त्याला मारलेला टोमणा त्याला आवडला नव्हता.

चंद्रलोकात तसं खिलाडू वातावरण असे. दोन द्यावे—दोन घ्यावे! पण ज्ञानेशनं टोमणा खिलाडू वृत्तीनं दिलेला नव्हता. चक्क खवचटपणा होता तो!—त्यामुळं चंदरनं आपले ओठ घट्ट दाबून धरले होते.

त्या मागला कार्यकारणभाव कवड्यानं अचूक ओळखला. अन म्हणून त्यानं चंदरची नजर टाकली. नजरानजर झाली तर हसू फुटेल ना?—

आपल्या बंद ओठाआड दडलेला विचार कवड्यानं ओळखला हे चंदरला उमगलं होतं. अन् म्हणूनच त्यानंही कवड्याची नजर टाळली.

पण ज्ञानेशला कशाचंच भान नव्हतं!–नाही तरी तो नेहमी फक्त स्वत: मध्येच गुंग असे.

त्यामुळं तो हसत, हसत सांगू लागला—"तर ती म्हण अशी की, 'ढवळ्यासंगे पोवळा बांधला, वाण नाही पण गुण लागला—' म्हणजे असं की, ढवळा आणि पोवळा ह्या दोन बैलांना मुद्दाम एकत्र बांधले मालकानं! अशासाठी की, ढवळ्याचा पांढरा वाण–वर्ण—तांबूस रंगाच्या पोवळ्याला लागावा आणि तोसुद्धा पांढऱ्या शुभ्र रंगाचा व्हावा!—पण-- झालं उलटंच! ढवळ्याचा पांढरा वाण पोवळ्याला जडला नाही—तर पोवळ्याचा मारकुटेपणाचा गुण—खरं म्हणजे, दोष हं—ढवळ्याला जडला! आलं ना लक्षात, मंडळी?"

सगळे गप्प होते. जणू त्यांनी एकमतानं तात्पुरतं मौनव्रत स्वीकारलं होतं!

ज्ञानेशाला हेसुद्धा जाणवलं नाही.

आपल्याच नादात तो म्हणाला, "तर चकल्या, तुला टरबुज्याचं बाळसं जडलं नाही. तू पूर्वीसारखाच काटकोळा राहिला आहेस. पण टरबुज्याचा इतरांची टिंगल करण्याचा गुण—अर्थातच दोष—मात्र तुला जडला! कसं?"

आणि तो खदखदून हसला.

तरीही सारे गप्प !—

मग टरबुज्या उठला. " सन्मित्रांनो, मी ह्या पहिल्या तारखेपासून व्यायामशाळेत नाव घातलं आहे. आशा आहे की, ज्ञानेशच्या बारीक डोळ्यात न मावणारं माझं बाळसं त्यामुळं हटेल ! "

आता मात्र पोरं हसली.

कारण ज्ञानेशाचे डोळे फारच बारीक—अगदी चिनी लोकांसारखे मिचमिचे होते. त्यावरून मित्र त्याला ' चिनु ज्ञानु ' असं चिडवीत असत.

आता त्या आठवणीनं पोरं हसली. टरबुज्या हे चंदरला सांगेल असं भय वाटलं ज्ञानेशाला. पण आपापसांत एकमेकाला चिडविणं आणि परक्या समोर आपल्यातल्या एकाला चिडविणं ह्यात फरक आहे हे सगळे सन्मित्र जाणत होते.

त्यामुळं टरबुज्यानं आपल्या मघाच्या बोलण्याला वेगळा फाटा फोडला.

" चंदर, " त्यानं म्हटलं, " चंद्रलोकी तुम्ही व्यायाम करीत असाल ना ? "—तुम्ही आमच्याच वयाचे वाटता. तुमची चण लहान दिसली तरी कशी वळकट वाटते. म्हणून म्हणतो, तुमच्या इथले व्यायामाचे प्रकार जरा सांगा ना—कसले, कसले व्यायाम करता तुम्ही ! "

" आम्ही चंद्रनमस्कार घालतो—" चंदरनं सस्मित उत्तर दिलं.

मघापासून गप्प असलेले ते अष्ट सभासद आश्चर्यानं मनापासून हसले.

" वा: ! " कवड्या उद्गारला, " चंद्रलोकी चंद्रनमस्कार !—छान !

आता टरबुज्याची टर उडविण्याची, नुकतीच आपण तुच्छ गणलेली पद्धत उचलीत ज्ञानेश म्हणाला, " पुढं ' समसमा संयोग की जाहला ' हे का नाही बोललास ?—तूच मघा उच्चारलं होतंस ते—"

" वाटलं, जरा छानसं बोलण्याची तुला संधी द्यावी !—आम्हीच घाईनं बोलतो. अन तुला ते ठाऊक असूनसुद्धा बोलण्याची सवड मिळत नाही अशी भुणभूण असते ना तुझी नेहमीची ?—शिवाय, एकदा मी तो

अर्धा चरण उच्चारला होता. परत तोच उच्चारणं ठीक वाटत नाही. आता तू तो बोलून दाखविलास. मुळात तो मी म्हटला होता हे देखील चंदरना सांगितलंस !—तेव्हा मी तुझे आभारच मानायला हवेत, ज्ञानेशा-अं—चंदर, तुमच्या चंद्रनमस्काराबद्दल सांगा ना. आम्ही सगळेच व्यायाम करू तो. व्यायाम हा म्हणे, राजवैद्यांच्या गुटिकेसारखा असतो !" कवड्या म्हणाला—

"म्हणजे कसा रे ?" तिरपे, अमोरसमोर उभे असलेले तवश्या आणि परश्या एका—जुळ्या—स्वरात ओरडले.

तसं सर्वांनाच हसू आलं.

"अरे, राजवैद्याची गुटिका म्हणे लठ्ठ माणसाला बारीक बनविते आणि बारीक माणसाला लठ्ठ बनविते !—" कवड्यानं फोड केली.

सर्वांनाच गम्मत वाटली हे ऐकून.

तेवढ्यात शरच्चंद्र म्हणाला, "मला वाटतं, की, चंदरनी व्यायामासारख्या मेहनतीच्या विषयावर बोलण्यास सुरुवात करण्याआधी त्यांना आपलं अस्सल महाराष्ट्रीय कैरीचं पन्हं प्यायला द्यावं—"

"खरंच की !—बेळीच सुचलं रे तुला ! आपण बुवा विसरलो होतो साफ—" कवड्यानं कबूल केलं.

लगेच ज्ञानेशनं म्हटलं, "मग शरच्चंद्र आपल्या समितीचा चिटणीस आहे ! त्यानंच हे लक्षात ठेवायला हवं !"

"पण ज्ञानेशा, चंदर आपले सर्वांचे पाहुणे आहेत ! आणि त्यांचा पाहुणचार करण्याची जबाबदारी चिटणिसापेक्षा अध्यक्षावर अधिक असते !—तेव्हा आपण सगळेच विसरलो होतो. शरच्चंद्रानं आपल्याला सावरलं हेच खरं !" यमक्यानं स्पष्ट सांगितलं.

मग पलीकडल्या कोपऱ्यात टेबलावर झाकून ठेवलेल्या खाण्याच्या स्टीलच्या दहा ताटल्या आणि केशरी पन्हं भरलेली चांदीची दहा फुलपात्रं शरच्चंद्र आणि इतर सभासदांनी ट्रेमधून चंदरजवळ आणली.

ज्ञानेशानं पन्ह्याचे फुलपात्र आणि ताटली चंदरपुढं ठेवली.

ताटलीत कच्ची वाटली डाळ, रव्याचा लाडू आणि कांद्याची भजी हे खाणं होतं.

" चन्दर, आमच्यापेक्षां तुमच्याकडली सैपाकाची रीत वेगळी असेल ना ? " कवड्यानं प्रश्न केला,

" होय, कवड्या !– मात्र, तुमची ही कच्ची वाटली डाळ आमच्या सैपाकात बसू शकेल. कारण आम्ही कच्ची कंदमुळं आणि फळं विशेष-करून खातो. तळण आमच्या इथं नाहीच. काही वस्तू आम्ही भट्टीत भाजतो."

" आणि भात–पोळ्या––" क्षितींद्रानं विचारलं.

" आमच्याकडं तांदूळ होत नाही. तुमची ज्वारी असते ना, तिच्यापेक्षा मोठा दाणा असलेलं राखाडी रंगाचं एकच धान्य आमच्या इथं पिकतं–त्या धान्याचं नाव ' चिंकुरी '–त्याचं पीठ करून आमची आई, आजी भाकरी करतात आणि त्या भट्टीत भाजतात–" चंदरनं सांगितलं.

" अन दूध—दुभतं ? " कवड्याचा प्रश्न.

" ते रग्गड असतं ! ' चिंकुरी 'च्या भाकरीबरोबर आम्ही घरच्या दुधाचं साईसकट विरजलेलं दही खातो. क्वचित दह्याचं ताक केलं तर लोणी मिळतं. पण लोणी कढवून त्याचे तूप करीत नाही आम्ही. तो प्रकार म्हणजे कढविणं, तळणं आमच्याकडं नाहीच. फक्त भाजणं– पण मी आज तुमची ही भजी खाऊन बघणार हं." चंदर म्हणाला.

" तुम्ही तिखट खाता किंवा नाही अशी शंका अं–कवड्यानं काढल्या-मुळं थोडीच मिरची घातली आहे आमच्या सैपाकिणीनं—" आपल्याकडं नोकरांची रेलचेल आहे हे ज्ञानेशानं आपल्या मतानं खुबीनं सांगून टाकलं.

पण दुसऱ्याच क्षणी त्याची खुषी मावळली.

कारण चंदर पटकन बोलला, " अरे, अरे !–मला वाटलं होतं तुमच्या आईच्या हातचे, घरगुती पदार्थ खायला मिळतील ! "

तसं शरच्चंद्रानं म्हटलं, " ही कच्ची डाळ माझ्या आईनं केली आहे हं, चन्दर ! आमच्या इथं सैपाकीण कशी असणार ? "

ज्ञानेशाला राग आला. पण तोंडात कोंबलेल्या भज्याबरोबर त्यानं तो गिळला.

आणि पन्ह्याचा निर्देश करीत तो म्हणाला, " हे केशरी पन्हं माझ्या आईनं केलंय. आणि मुद्दाम तुम्हाला—चन्द्रलोकीच्या चन्दरना–आणि तुमच्यासमोर सर्वांना चांदीच्या फुलपात्रातून पन्हं दिलंय–"

आपल्या श्रीमंतीची ज्ञानेशानं जाहिरातबाजी केली.

तसा चंदर सहजी उत्तरला, " तुमच्या इथं ताटं; वाट्या, फुलपात्रं, तांब्या आणि तबक, कुठं श्रीखंडासाठी पातेलं अशी चांदीची भांडी असतात ना ?–आमच्याकडं तुमच्या पूर्वीच्या तांब्या, पितळेच्या आणि हल्ली सर्रास वापरात असलेल्या स्टेनलेस स्टीलप्रमाणं सैपाकाच्या भांड्यापर्यंत आणि स्नानाच्या वादल्यापर्यंत एकूण एक भांडी चांदीची असतात ! "

" बापरे ! चन्द्रलोकात चांदी एवढी स्वस्त आहे ? " शरच्चंद्र सराफाचा मुलगा असल्यामुळे त्यानं हा प्रश्न केला.

" स्वस्त असण्याला महत्त्वच नाही ! आमच्या इथं ती एकच धात आहे. चन्द्रलोकात ठायी ठायी चांदीचे झरे सतत वाहत असतात ! ती चांदी जनतेच्या मालकीची आहे. कोणीही केव्हाही हवी तेवढी न्यावी आणि हव्या त्या वस्तू बनवाव्या–" चंदरनं सांगितलं.

" अरे वा !– गम्मतच आहे म्हणायची ! " चकल्या उद्गारला.

" हं ! फक्त पावसाळ्यात दोन महिने चांदीचे हे झरे आपोआप बंद राहतात !– थांबा तुम्ही आता तिथल्या हवामानाबद्दल विचाराल ते मी नंतर सांगणार आहे. सर्वांचे खाणंपिणं संपलं आहे. तेव्हा आधी आमच्याकडल्या व्यायामाबद्दल थोडक्यात सांगतो. " चंदरनं म्हटलं.

मुलांनी रिकाम्या ताटल्या नि फुलपात्रं भराभरा कोपऱ्यातल्या टेबलावर ठेवली.

सगळीजणं एकाग्र चित्तानं ऐकू लागली.

एवढ्यात कुठंतरी जवळच चांदीची घंटा किणकिणल्यासारखा नाजूक आवाज उमटला !

# नऊ

कसं कोण जाणे, पण हा आपल्या इथला आवाज नाही हे त्या सर्व सन्मित्रांना त्याच क्षणी उमगलं. साहजिकच ते जरा कावरे–बावरे झाले.

हे लक्षात आल्यामुळं आपलं सौम्य स्मित करीत चंदर म्हणाला, "गड्यानो, चंद्रलोकाहून मला रेडिओवर संदेश आल्याची सूचना आहे ही !"

मग त्यानं आपल्या पांढऱ्या शुभ्र अंगरख्याच्या खिशातून एक छोटी डबी काढली नि ती कानाला लावली.

काहीतरी ऐकलं त्यानं नि मग म्हटलं, "मंडळी, चंद्रलोकाहून ह्या टेलिफोनवजा रेडिओवर मला विचारण्यात आलं आहे की, इथली माझी कामगिरी संपवून मी कधी परत येणार ?—म्हणजे त्यावेळी मला नेण्यासाठी आमचं चंद्रयान इथं धाडणार—मघा मी त्या चंद्रयानातूनच आलो. अन मी लगेच ते माघारी पाठविलं—तर आणखी एका तासानं यान मागितलं आहे मी. तेवढ्यात सगळं आटपायचं—"

"एका तासानंच जाणार तुम्ही परत ?" कवड्यानं जरा अवघडत विचारलं—मग आपल्या हळुवारपणाची लाज वाटून तो म्हणाला,

"चंद्रयानातून मघा आलात तुम्ही ?—आम्हाला काहीच कळलं नाही दिसलं नाही—"

" आमचं चंद्रयान चंद्रलोकाच्या बाहेर पडलं की, अदृश्य होतं! ते फक्त मला दिसू शकतं. आणि त्याचा वेग प्रचंड असला तरी ते स्वनातीत आहे. म्हणजे, त्याच्या यंत्राचा जराही आवाज येत नाही. त्यामुळं तुम्हाला काही कळलं नाही, दिसलं नाही, कवड्या—" चंदरनं समर्पक स्पष्टीकरण दिलं.

" बरं, आता तुमच्याकडल्या व्यायामाबद्दल सांगता ना?" टरबुज्यानं मुद्द्यावर आणलं चंदरला.

" होय ना!—तर—मघा मी सांगितलं की, आम्ही चंद्रनमस्कार घालतो. पण आमच्या इथं व्यायामाच्या सर्वच प्रकारांना चंद्रनमस्कार हेच नाव आहे—तुमच्याप्रमाणं आम्ही जोर, बैठका वगैरे व्यायाम करतो. आणि ह्यातला कोणताही व्यायाम करताना चंद्राकडं तोंड करून आम्ही त्याला प्रथम नमस्कार करतो."

" आणि म्हणून तुम्ही सर्व तऱ्हांच्या व्यायामाला चंद्रनमस्कार म्हणता होय?" यमक्या बोलला.

" बरं, आता तुमच्या शिक्षण पद्धतीबद्दल सांगता थोडं?" कवड्यानं म्हटलं—

" होय—त्याबद्दल खूपच सांगण्यासारखं आहे—कवड्या, मघा तुम्ही आमच्या लोकसंख्येची गणना केली होती. तेव्हा आमच्याकडं मुलगे आठ हजार आणि मुली आठ हजार असतात हा आकडा तुम्हाला कळला होता!—ह्या एकूण सोळा हजार मुलांसाठी चारशे तुकड्या असलेली एकच खूप मोठी शाळा आहे आमच्याकडं! अगदी प्राथमिक शिक्षणापासून शालान्त परीक्षेपर्यंत तुमच्याप्रमाणंच अभ्यासक्रम असतो—" चंदर म्हणाला—

मग त्यानं इतर बारकावे सांगितले. ह्या शाळेतल्या प्रत्येक तुकडीत वीस मुलगे आणि वीस मुली असतात. दहा एकर क्षेत्रफळ असलेल्या जागेवर चारशे खोल्यांची ही प्रशस्त बैठी इमारत बांधली आहे.

संस्कृत, मराठी, इंग्रजी, रशियन आणि फ्रेंच ह्या पाच भाषा—अंक-गणित, बीजगणित, भूमिती आणि त्रिकोणमिती ही चार गणितांगं—रसायन-शास्त्र, पदार्थ, विज्ञानशास्त्र, भूगोल व इतिहास हे आणखी चार विषय '—

प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात भाषांपैकी संस्कृत आणि इंग्रजी ह्या दोनच भाषा, अंकगणित आणि इतिहास, भूगोल एवढेच विषय शिकविले जातात. शालान्त परीक्षेपर्यंतचा अभ्यासक्रम बारा वर्षांचा असतो.

शालान्त परीक्षेच्या अभ्यासक्रमासाठी इतर उरलेले विषय घेणं आवश्यक असतं—आणि ज्या मुलामुलींना वैद्यकशास्त्राच्या—मेडिकल—कॉलेजात जायचं असेल ती मुलं रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञानशास्त्र वगैरे सायन्सची अंगं शिकतात—एंजिनिअरिंग कॉलेजात जाणारे मुलगे—मुली इथं वळत नाहीत—गणितांगांचा आपल्या अभ्यासक्रमात समावेश करतात. कॉलेज अभ्यासक्रम चार वर्षांचा असतो—

नंतर चंदरनं म्हटलं, " मुलगे पाचव्या वर्षी आणि मुली चौथ्या वर्षी शाळेत जाऊ लागतात. "

" मग भावंडं लहान मोठी असूनही एकाच वर्गात बसत असणार. ना ?—बहीण कां बरं—भावाहून लहान वयात शाळेत जाते ? " टरबुज्यानं शंका खाढली.

" अरे, भावापेक्षा एका वर्षानं लहान असताना बहिणीचं लग्न होतं ना ? तेव्हा शालान्त परीक्षा झाल्यावर त्यांनासुद्धा कॉलेजचा चार वर्षांचा अभ्यासक्रम लग्नापूर्वी पूर्ण करता येतो ह्या योजनेमुळं. " कवड्यानं परस्पर शंकानिरसन केलं.

नंतर चंदरनं आणखी माहिती सांगितली.

ज्या वर्गाच्या ज्या तुकडीत मुलं बालवर्गात असतात त्याच तुकडीत आणि त्याच खोलीत ती शालान्त परीक्षेपर्यंत बसतात. त्यांच्या दर आठवड्याला परीक्षा घेतल्या जातात—आणि त्या निकालावर न अवलंबिता मुलामुलींना दर वर्षी वरच्या वर्गात—इयत्तेत—चढविलं जातं.

हे ऐकून ज्ञानेश खूष झाला.

" हुं: !—आमच्याकडंसुद्धा अशी पद्धत असती तर छान झालं असतं!" तो चुटपुटला.

त्यावर चंदर म्हणाला, " पण हे शालान्त परीक्षेपर्यंतच असतं ! तिथंवर ढकलत आलेल्या काही मुलामुलींना अर्थातच मेडिकल कॉलेजात किंवा एंजिनिअरिंग कॉलेजात प्रवेश मिळत नाही ! "

" मग ती पुढं काय करतात ? " क्षितींद्रानं प्रश्न केला.

" त्यांच्यासाठी वेगळी व्यवस्था असते !—जर गणित किंवा सायन्स ह्या विषयांची त्यांना गोडी नसेल तर फक्त भाषाविषय शिकण्याचं तिसरं कॉलेज आहे—तिथं अध्ययनाबरोबर अध्यापनाचंही शिक्षण दिलं जातं. आणि ह्यातूनच आमचे शिक्षक तयार होतात ! " चंदर उत्तरला.

त्यानं पुढं सांगितलं की, भाषाविषयातही रस न वाटणारे मुलगे सुतार-काम, शिंपीकाम, घरबांधणी, चित्रकला, फोटोग्राफी, शिल्पकला ह्या विषयांचं चार वर्षं शिक्षण घेतात—आणि पदवीधर होतात. ह्या विषयां-पैकी कोणते तरी तीन विषय त्याना घ्यावेच लागतात.

मुलींसाठी माध्यमिक शिक्षणानंतर वेगळा अभ्यासक्रम असतो. त्यात शिवणकाम, भरतकाम, शिशुसंगोपन, आजाऱ्यांची शुश्रूषा, पाककला—म्हणजे सैपाक करण्याची कला— गृहसजावट वगैरे अनेक संसारोपयोगी विषय असतात !

अर्थातच ज्या हुषार मुलींना आणि ज्यांना तशी आवड असते त्या मुलींना इतर मुलांबरोबर आवश्यक तो अभ्यासक्रम घेऊन शालान्त परीक्षा चांगल्या रीतीनं उत्तीर्ण झाल्यावर मेडिकल कॉलेजात प्रवेश मिळतो.

" आम्हाला डॉक्टरांप्रमाणं थोड्या डॉक्टरणीसुद्धा हव्या असतात. आणि बरं का, जिथे बालवर्गापासून शाळा भरत आलेली असते, त्या खोल्यांतच पुढं कॉलेजचे वर्ग भरतात ! खोल्या, खोल्यांमधल्या भिंती लाकडी असतात—त्यामुळं तिथं कॉलेज सुरू होताच मधल्या एक किंवा

दोन भिंती सरकवून वर्ग आवश्यक तेवढे मोठे केले जातात. त्याशिवाय त्या चारशे खोल्यांखेरीज मेडिकल कॉलेजसाठी तीन प्रशस्त प्रयोगशाळा आणि एंजिनिअरिंग कॉलेजसाठी दोन लांबरुंद ड्रॉइंग हॉल्स आहेत !—" चंदरनं सांगितलं.

" तुमच्याकडं कायद्याचे शिक्षण देण्यासाठी कॉलेज नसतं ? तुमच्या अभ्यासक्रमात कायद्याला समावेश नसतो काय ?" चकल्यानं विचारलं. याचे आजोबा आता मोडीत निघालेले का होईना पण वकील होते.

" आवडला तुमचा प्रश्न चकल्या—" चंदर उत्तरला, " ह्या प्रश्नामुळं आमच्या जीवनाची नीट ओळख पटेल तुम्हाला !—आमच्याकडं वकिलाची आवश्यकता लागत नाही. आमचे सर्वांशी सख्य असतं !—शिवाय भांडणं होण्याचं मुख्य कारण जो पैसा तो आम्हा सगळ्यांपाशी बेताचा—म्हणजे शिंप्याला शिलाई किंवा फोटोग्राफरला बाळाच्या बारशाचे वेळी आणि पुढं विवाहप्रसंगी काढलेल्या फोटोची किंमत देण्यापुरताच पैसा असतो. कारण आम्ही आपापलं शेत कसतो. कुठंच कोणाशी चुरस करण्याचा प्रसंग येत नाही. मग भांडणं कशी होणार आणि कज्जेदलाल वकिलांची गरज कशाला लागणार ?—आमचे जीवन अगदी सुशिस्त असतं ! "

" पण—असं सगळं काही कडक इस्त्रीच्या शिस्तीत केल्यानं तुमचे जीवन यांत्रिक नाही का बनत ? " टरबुज्यानं हळूच विचारलं.

" बनतं ! मात्र त्याचमुळं ते सुशिस्त राहतं ! बेशिस्त जीवनापेक्षा काहीसं यांत्रिक पण सुशिस्त जिणं आम्हाला योग्य वाटतं—सवयीनं तेच आवडतं ! " चंदरनं उत्तर दिलं.

" खरं आहे, चंदर. " कवड्या म्हणाला, " वस्तुतः निसर्ग आपला मोठ्यात मोठा गुरू आहे. आणि तो आपल्याला रात्रंदिवस शिस्तीचे धडे देत असतो. पण आपण ते मनावर घेत नाही. मित्रांनो, सांगा बरं, सूर्य रोज वेळेवर उगवतो, मावळतो ना ?—मग त्यानं ही शिस्त सोडली तर

केवढा गोंधळ होईल!—समुद्राला रोज भरती, ओहोटी येते. पण तो कधी किनाऱ्याची मर्यादा उल्लंघीत नाही! पौर्णिमेचे दिवशी भरतीच्या लाटांबरोबर जर त्यानं ही मर्यादा ओलांडली, शिस्त झुगारून दिली तर तर—पानशेत धरणफुटीचा प्रलय ओढवेल की!—तेव्हा मित्रांनो, आपणही निसर्गाची शिस्त आपल्या वागण्यात बिंबवायला हवी!—चंद्रलोकीच्या माणसांप्रमाणं आपण सुशिस्त वागायला हवं—आवर्जून त्याचे अनुकरण करायला हवं!"

"मात्र, कवड्या, आम्हालासुद्धा बालवयात एकेकदा शिस्त थोडी झुगारण्याचा मोह पडतो--ऐकलंत ना क्षितींद्रमोहन?—पण जन्मतः शिस्त आमच्या अंगांगांत एवढी भिनलेली असते की, आम्ही लगेच स्वतःला आवरतो किंवा एकमेकांना सावरतो—ते प्रकरण आई, वडील-आजी, आजोबा" अथवा शिक्षक ह्या गुरुजनापर्यंत कधीच जात नाही. चंदरनं स्मित करीत म्हटलं.

"वा:!" ज्ञानेश म्हणाला, "आम्हाला तुमच्या चंद्रलोकातल्या राहणीबद्दल खूपच माहिती मिळाली हं!—मित्रांनो, सन्मित्रांनो—" मघा बोलण्याच्या भरात कवड्या दोनदा 'मित्रांनो' म्हणाला होता हे लक्षात आल्यामुळं ज्ञानेशानं लगेच दुरुस्ती केली. आणि तो पुढं बोलला,

"तर सन्मित्रांनो, चंदरकडून ऐकलेले सगळे मुद्दे तुम्ही टिपून ठेवा हं. आपण आपल्या हस्तलिखित मासिकात सगळ्यांच्या मुद्द्यामधलं सार लिहून काढू. काय हो चंदर, तुमच्याकडं अशी हस्तलिखित मासिकं काढतात काय शाळकरी विद्यार्थी?"

"काढतात तर!" चंदर उत्तरला, "मात्र ती हस्तलिखित नसतात. आम्ही माध्यमिक शाळेत गेलो की, प्रत्येकाला एकेक छोटा टाइपरायटर देण्यात येतो. त्या टाइपरायटरवर आम्ही अभ्यासाचं आणि आपापल्या वर्गाच्या मासिकाचं लेखन करतो."

"अरे वा:! टाइपरायटर—अन तो प्रत्येकाला स्वतंत्र एकेक!—

हंऽ !—आम्हाला माध्यमिक शाळेत बॉलपेन किंवा फौंटन पेन वापरण्याची जेमतेम परवानगी मिळते-—टाइपरायटर !—हुं ऽ ! ” ज्ञानेश पुनः उसासला.

“ आणि प्राथमिक शाळेत तुम्ही काय वापरता ? ” चकल्यानं प्रश्न केला.

“ अगदी तुमच्याचसारख्या पाट्या पेन्सिली घेवोनी शाळेला जातो आम्ही. आमच्या पाट्या पत्र्याच्या नसतात. खऱ्या स्लेट पाट्या—दगडी पाट्या आणि दुधी पेन्सिली. ” चंदरनं उत्तर दिलं.

“ अरे वा: ! म्हणजे अगदी आपल्यासारखंच !— ज्ञानेश, ह्यांची आणि आपली सुरुवात सारखीच आहे !—तेव्हा पुढली टाइपरायटरची प्रगती करणं आपल्यावर अवलंबून आहे. प्रत्येक मुलाला नाही, पण वर्गणी काढून, शाळेकडून, पालकांकडून देणगी मिळवून आपण आपल्याला वर्गासाठी एकेक टाइपरायटर विकत घेण्याची योजना आखू या. ” कावडयानं किती मनापासून हे सुचविलं.

पण टरबुज्याची खुमखुमी कशी गप्प बसेल ?

तो लगेच ओरडला, “ पंचवार्षिक योजना की, दशवार्षिक योजना रे ?”

“ काही का असे ना—त्याला छानदार सुचलं, ते आम्हा सर्वांना रुचलं. मग ते तुला का नाही पचलं ? “ यमक्यानं आपल्या शैलीत टरबुज्याला सवाल केला.

तसे सगळे हसले.

पोरगे हसले, जरा जादा गडबड झाली की, ज्ञानेशाला आपल्या अध्यक्षीय जबाबदारीची जाणीव होई. ह्याबरोबरच घंटा बडविण्याचीसुद्धा जोड जाणीव होई त्याला.

म्हणून घंटा दावीत तो ओरडला, “ सा—सायलन्स !—हे पाहा, सन्मित्रांनो, चंदरनी आपल्याला चंद्रलोकीची बरीच माहिती दिली आहे. तेव्हा ज्या कामासाठी चंदर इथं आले आले आहेत ते पूर्ण करू या

आपण—कवड्या, आपली दोघांचीच पाळी राहिली आहे. आपण आपापले विनोदी—नमुने—सादर केले की..." प्रारंभी हे तीन शब्द उच्चारताना झालेला गोंधळ आठवून ज्ञानेश सावकाश बोलत पुढं म्हणाला, "की, चंदरना निकाल लावणं उरकता येईल—"

कवड्यालासुद्धा आधीची एक आठवण आली.

तो उभा राहत बोलला, "माफ कर, ज्ञानेश-—मला चंदरना आणखी थोडी माहिती विचारायची आहे—"

"बरं, बरं-—विचार काय ती-—" ज्ञानेश पुटपुटला.

"आभार, अध्यक्षमहाशय—" कवड्यानं म्हटलं.

तो पुढं बोलणार एवढ्यात ज्ञानेश वतवतला, "आणखी थोडी माहिती म्हणजे चंद्रलोकीच्या हवामानासंबंधी ना?—मग चंदर ती सांगणार आहेतच—त्यांची स्मरणशक्ती तल्लख आहे म्हटलं, कवड्या!—"

"ती कल्पना आहे म्हटलं, मला!—पण मला त्यांना आणखी दोन वेगळे प्रश्न विचारायचे आहेत. चंदर, विचारू का मी?" कवड्यानं लाजवट स्मित करीत म्हटलं—

"अवश्य, विचारा—सन्मित्रांनो, तुम्ही माझ्यावर रुसू नका हं—पण का कोण जाणे, तुम्हा-नवग्रहात मला कवड्या भारी आवडला आहे!—अं—कवड्या, असं तर नसेल ना, की, कुठल्या तरी पूर्वजन्मी तू आमच्या चंद्रलोकात जन्म घेतला होतास—म्हणून मला तुझ्याबद्दल अशी आगळी आपुलकी वाटतीय?—बोल ना, कवड्या—"

कवड्याला बोलायला सुचत नव्हतं. तो कमालीचा भारावला होता-—अहा! चंदरला आपल्याबद्दल एवढी आपुलकी वाटतीय, त्यांनी आपल्याला एकवचनात संबोधलं-—

मघाच्याच लाजवट आवाजात कवड्या म्हणाला, "चंदर, तुम्ही—मला—अरे म्हटलंत?—"

"होय, गड्या—" चंदर बोलला आणि आपल्या अंगभूत मुत्सद्दी-

पणानं त्यानं म्हटलं, " आपण सगळेच एकमेकांना एकवचनात संबोधू या कसं?--आवडेल ना तुम्हाला, सन्मित्रांनो? "

सगळे खूष झाले. एकमेकांना खुषीची टाळी देण्यात गढले--ज्ञानेशही कवड्याला टाळून चकल्याला आणि इतर आपल्या शेजारच्याला टाळ्या देण्यात गुंग असलेले पाहून कवड्यानं चंदरकडं पाहिलं. तोसुद्धा कवड्याच्या नजरेला नजर मिळण्याची वाट बघत होता!

नजरानजर होताच दोघेही खूण पटल्यागत गालातल्या गालात हसले. खरं म्हणजे, कवड्याला एवढा आनंद झाला होता की, त्याला खळखळून हसावं असं वाटत होतं!--ओहो ऽ! चंदरनं केवढा सन्मान केला आपला!--रौप्यपदक इतर कुणाला मिळू दे खुश्शाल!--अन् पुन: स्मित केलं त्यानं.

तेवढ्यात टरबुज्याच्या डोक्यातून एक वेगळी शक्कल निघाली. त्याला कवड्याच्या अंगातल्या गुणांबद्दल कौतुक वाटत असलं तरी चंदरनं कवड्यविषयी वर्णन केलेली आपुलकी थोडी आपल्या वाट्यालाही यावी असं त्याच्या मनात आलं.

तो हसून बोलला, " चंदर, गड्या, तू ..." चंदरनं दिलेली एकवचनाची सवलत पठ्ठ्यानं लगेच स्वीकारली--" म्हटलंस की, कुठल्या तरी जन्मी कवड्या चंद्रलोकी जन्मला असणार!--पण मी म्हणतो, कुठल्या तरी जन्मी तूच आमच्या भारतातल्या ह्या पुणे शहरात जन्मला होतास, असशील! काय, दोस्तांनो, कशी वाटते ही कल्पना? "

सर्वांनी ह्या कल्पनेचं कौतुक केलं.

मग चंदरनं म्हटलं, " मलासुद्धा आवडली ही कल्पना, टरबुज्या!--कारण चंद्रलोकी आम्हाला सख्खा भाऊ नसतो. मी कुठल्या तरी जन्मी पुणेकर असलो तर त्या जन्मी कवड्या नक्कीच माझा सख्खा भाऊ--कदाचित ह्या तवश्या, परश्याप्रमाणं जुळा भाऊ--होता-असणार! "

हुं!- म्हणजे चंदर आपल्यातला असणार असा निष्कर्ष आपण मारे

काढला तर चंदरनं तोसुद्धा कवड्याभोवतीच गुरफटला !—

पण दुसऱ्याच क्षणी त्याच्या अंगातला खिलाडूपणा जागा झाला— टरबुज्याचं अंग मोठं, गरगरीत होतं तसं त्याचं मनही मोठं होतं. चंदरनं कवड्याबद्दल आपुलकी दर्शविली हे आपणा सर्वांनाच भूषणावह आहे— आपल्या ' सन्मित्रमंडळा 'लाच नव्हे, तर सगळ्या पुणे शहराला, फार काय, महाराष्ट्रालाच नव्हे, तर भारतालासुद्धा अभिमानास्पद आहे !—

टरबुज्या कल्पनेची भरारी आता ह्या दिशेनं वाहत सुटली.

अन् तो मजेत ओरडला, " बोला, मंडळी—कवड्याराव झिंदाबाद ! चंदरराव झिंदाबाद ! "

सात सन्मित्रांनी ही दुहेरी घोषणा सणसणीत आवाजात दुमदुमवली. फक्त ज्ञानेशाचा आवाज फारसा ऐकू आला नाही.

कदाचित मस्तकात पोचलेली तळहाताची कळ आता त्याच्या गळ्यात उतरली असेल ! —

ज्ञानेशाला घंटी वाजविण्याची संधी न देता चंदरनं हळूच आपला हात वरती केला. लगेच मुलं आवडीनं गप्प झाली.

" कवड्या, " चंदर म्हणाला, " आता विचारतोस ना तुझे दोन प्रश्न ? "

" होय. विचारतो. पण तुम्ही...."

" उंहुं !—तू—" चंदरनं ' वचन ' बदललं.

" कवड्या, अरे, तुझ्यामुळं तर आम्ही सगळे चंदरच्या इतके जवळ —एकवचनात–आलो ! टरबुज्यानं खुशाल त्याच्याशी बोलताना मघा एकवचन वापरलं. आणि तू कुचंबतो आहेस ?–कारण सन्मित्रांनो, आपला कवड्या कवड्या आहे !–त्याला आगाऊपणाचं, खुशामतगिरीचं वावडं आहे ! म्हणून तर मघा आपण त्याच्या नावानं घोषणा केली...."

पण चकल्याचं वाक्य तिथंच थांबलं आणि ज्ञानेशखेरीज सात सन्मित्रांनी पुनः घोषणा केली—" आपला कवड्या झिंदाबाद ! "

चंदरनंसुद्धा आवडीनं आपला आवाज ह्यात मिसळला. पहिल्या 'आपला' ह्या शब्दाबरोबरच चंदरनं सूर गाठला होता–चंदरदेखील घोषणा देतोय हे लक्षात येताच ज्ञानेशानं भराभरा शेवटला 'बाद' तारस्वरात उच्चारला.

शरच्चंद्राचा पोषाख जरा बोजड असल्यामुळं कवड्या, चकल्या, तवश्या परश्या आणि यमक्या ह्या पाचजणांनी परसातल्या नळावर मघाची उष्टी फुलपात्रं—चांदीची फुलपात्रं—विसळली. चांदीच्या तांब्यातून ज्ञानेशानं पुन: भरून आणलेलं पन्हं यमक्यानं ओतलं आणि आता बरोबरीच्या नात्यानं त्या दहाजणांनी हसत, बोलत पन्हं पिऊन टाकलं.

फुलपात्रं परत कोपऱ्यातल्या टेबलावर जाताच एकमतानं सर्वजण आपापल्या खुर्चीत बसले.

चंदरना आणखी कसले तरी प्रश्न विचारण्यासाठी उभ्या राहिलेल्या कवड्याकडं सगळे जण कुतूहलानं बघत होते.

## दहा

तसं म्हटलं तर कवड्याच्या वयाच्या मुलांना लाजणं, बुजणं ठाऊक नसतं. बहुधा ती धीट, सभाधीट असतात. पण कवड्याची पौगंडावस्था सुरू होती. तेरापासून एकोणीस वर्षापर्यंतचं हे वय जरा मुलांना गोंधळात टाकतं.

मघापासून कवड्या खूप बोलला, मुद्देसूद बोलला. पण 'भावड्या' संबंधीची माहिती सांगताना तो असाच जरा बावरला होता.

आता चंदरनं त्याला कुठल्या तरी जन्मीचा आपला भाऊ–जुळाभाऊ–

मानण्याएवढी आपुलकी दाखविली होती.

आणि ह्या आपुलकीमुळंच कवड्या थोडा कुचंबत होता. आपले प्रश्न चंदरच्या पसंतीस उतरतील ना अशी त्याला धास्ती वाटत होती.

त्यातून सगळे जण त्याच्याकडंच पाहत होते.

त्यामुळं आपला गोंधळ त्या बेट्यानं हसण्यावारी नेला–

अन् त्यानं म्हटलं, " चंदर, चंद्रलोकात तुम्ही मंडळी कोणते सण साजरे करता नि ते कसे साजरा करता असं विचारायचं होतं अं--- तुलं– "

" ओऽहोऽ! मस्त प्रश्न विचारलास, गड्या!" सगळे सन्मित्र– अर्थातच फक्त सात सभासद–ओरडले.

" खरं आहे!" चंदर म्हणाला, " हा प्रश्न हवामानाबद्दल सांगतानाच मी स्पष्ट करीन. बरं, तुझा दुसरा प्रश्न कोणता?"

" चंद्रलोकी तुम्ही कोणते उद्योगधंदे करता हे कळायला आवडेल आम्हाला, चंदर–" कवड्या बोलला.

" छान!–दोस्तांनो, आपला कवड्या मार्मिक प्रश्न विचारतो हं. मोठेपणी तो उत्तम मुत्सद्दी होईल!" चंदर उद्गारला.

" बरोबरच आहे! कुठल्या तरी जन्मी चंद्रलोकीच्या चंदरचा भाऊ असलेला कवड्या चंदरसारखाच तरल बुद्धीचा असणार?" चकल्या उत्तरला.

ह्यावर आभार प्रदर्शित करण्यासाठी मंद स्मित करीत चंदर म्हणाला, " पण मला वाटतं, कवड्यानं आणि तुमच्यापैकी ज्यांना ती आवड असेल त्यांनी संशोधन करावं—"

चंदरची बुद्धी नक्कीच तरल होती, तीव्र होती, समयसूचक होती. कारण ज्या सन्मित्रांना तशी आवड असेल असं तो मुद्दाम बोलला. ज्यांची बुद्धिमत्ता कवड्याच्या तोडीची असेल हे सत्य उच्चारणं त्यानं टाळलं.

मग तो पुढं म्हणाला, " अमेरिका, इंग्लंड, रशिया वगैरे राष्ट्रं आमच्या

चंद्रलोकात पाऊल ठेवण्यास आता सरसावली आहेत. तुम्ही ' आर्यभट ' यान अंतराळात यशस्वीरीतीनं सोडलं होतं. तेव्हा ह्याच विषयात अधिक संशोधन करून आणखी दहा, बारा वर्षांनी पंचविशीतल्या कवडया आणि कंपूनं नव्या यानातून अवश्य आमच्याकडं यावं असं आमंत्रण मी देतो–"

नवग्रहांनी खुषीत टाळ्यांचा गजर केला—

चंदरनं आता कवडयाच्या प्रश्नांची उत्तरं देण्यास सुरुवात केली.

हवामानाबद्दल त्यानं पुढील माहिती कळविली.

चन्द्रलोकी म्हणे, सहा महिने हिवाळा असतो ! पहिले तीन महिने कडक थंडी—नंतरचे तीन महिने जरा सौम्य थंडी—ह्या कडक थंडीच्या तीन महिन्यांत प्राथमिक शाळा बंद असते. चन्द्रलोकातले सगळे मुलगे आणि सगळ्या मुली एका वयाची असल्यामुळं ह्या मोसमात तिथली सगळी मुलं घरी असतात. घरातील वडील माणसं त्यांचा अभ्यास घेतात ह्या मुदतीत—

बहुधा दोनदा असल्या कडक थंडीत ही छोटी पिढी घरी बसते. तिसऱ्या हिवाळ्यात ती माध्यमिक शाळेत गेलेली असल्यामुळं थंडीतले दोन महिने त्यांना सुट्टी मिळते. तीन महिन्यांच्या कडक थंडीतला दुसरा नि तिसरा महिना—नंतर तीन महिन्यांची सौम्य थंडी सरल्यावर उन्हाळा सुरू होतो. चार महिन्यांचा उन्हाळा !—

" थंडी संपून आल्हाददायक उन्हाळा सुरू झाला की, तुमच्याच प्रमाणे आम्ही वसंतोत्सव हा पहिला सण साजरा करतो. सहा महिने वर्ज्य असलेली थंड पेय घ्यायची, निसर्गाच्या सान्निध्यात रमायचे, खेळायचे, वनभोजनाची मौज लुटायची ! कारण सुट्टी वजा जाता सतत तीन महिने शाळा असते. आणि ह्या मुदतीत पोरांनी शाळेत आणि थोरांनी कामाला जाण्यासाठीच बाहेर पडायचं—तर हा वसंतोत्सव म्हणजे आमचा पहिला सण—आणि त्यानिमित्त चार महिन्यांच्या उन्हाळ्यातल्या पहिल्या महिन्यात आम्हाला चार आठवडयांची सुट्टी असते—" चंदर सांगत होता.

" तुमच्या इथं आठवड्यांची नावं आमच्यासारखी असतात काय ?" शरच्चंद्रानं विचारलं—

" होय ! चंद्राचं सोम हे नाव घेऊनच आम्ही आठवड्यातला पहिला दिवस सोमवासर असा संबोधतो—" चंदर उत्तरला—

" वा—वासर—हं, हं ! संस्कृतात वासर म्हणजे दिवस, नाही का ? —आणि चंद्रलोकी ती महा अवघड संस्कृत मातृभाषा असतीय !" ज्ञानेश बोलला.

" पुढं, " चंदरनं म्हटलं, " एका महिन्याच्या सुट्टीनंतर उरलेला तीन महिन्यांचा उन्हाळा सरण्याआधी पंधरा दिवस आणि नंतर सुरू होणाऱ्या पावसाळ्यातले पंधरा दिवस मिळून पुन: एक महिना सुट्टी !—ही दीपोत्सवी सुट्टी ! तुमच्या दीपावलीसारखाच चार दिवसांचा सण आम्ही साजरा करतो—अगदी चतुर्दशी, अमावास्या, पाडवा आणि भाऊबीज !—फक्त ह्या चतुर्दशीला आम्ही नरकचतुर्दशी न म्हणता केतूचतुर्दशी म्हणतो—" आणि त्यानं कवड्याकडं पाहिलं.

तसा कवड्या म्हणाला, " बरोबर ! केतू चंद्राला ग्रासतो आणि त्यामुळं चंद्रग्रहण लागतं असा पूर्वापार समज आहे ना ?—पण . "

" बोल ना पुढं, कवड्या—" चंदरनं आग्रह केला.

" पण—चंदर, चद्रंग्रहणासंबंधीचा हा अपसमज आहे असं शास्त्रज्ञांनी निदान काढलंय ना ? सूर्य आणि चंद्र ह्या दोघांमध्ये पृथ्वी आल्यामुळं चंद्रावर सूर्याचा प्रकाश पडत नाही आणि तो थोडा दिसतो, कधीकधी मुळीच दिसत नाही. त्यावेळी चंद्राला ग्रहण लागलं असं म्हणतात. कंकणाकृती किंवा खग्रास ग्रहण !—वस्तुत: केतूनं चंद्राला ग्रासण्याचा प्रश्नच नसतो हे शास्त्रीय सत्य आहे ना ?" कवड्यानं म्हटलं.

" होय—पण कवड्या अजुनी तुमच्या इथं जुन्या परंपरा कितीतरी पाळल्या जातात—आम्हीसुद्धा ही पद्धत टिकविली आहे. इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी ह्या पुढारलेल्या राष्ट्रांतही जुन्या परंपरा आवर्जून पाळतात !

अजुनी त्यांच्या विशिष्ट जुन्या सणादिवशी ते लोक आपल्याला देशातले जुने, पारंपरिक पोषाक आवडीनं घालतात—"

"हो—खरं आहे. मग तुम्हीसुद्धा तुमचे जुने पोषाक घालता?" चकल्यानं विचारलं—

"होय. केतूचतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी येणारी अमावास्या आम्ही फार पवित्र समजतो—तुमच्याकडं सर्वपित्री अमावास्या असते ना?" चंदरनं प्रश्न केला—

"असते तर—भाद्रपद महिन्यातली अमावास्या ती!" क्षितींद्रानं उत्तर दिलं.

"हो!—आम्ही दीपोत्सवातल्या ह्या अमावास्येला सर्वपित्री अमावास्या म्हणतो—त्या दिवशी समाधी घेतलेल्या पहिल्या पिढीतले पणजोबा नि पणजीबाई पक्वान्न खायला येतात असं आम्ही मानतो—ह्या अमावास्येच्या रात्री आम्ही आपापल्या घराच्या पाठच्या आणि पुढच्या दारात स्वतः बनविलेले कागदी दिवे पेटवून टाकतो. मधल्या खोलीतही दिवे लावतो आणि तिथं पणजोबा नि पणजीबाई ह्यांना आवडणाऱ्या खाद्य वस्तू ठेवतो—बरोबर रात्री नऊच्या ठोक्याला आम्ही घराचं पाठचं आणि पुढचं ही दोन्ही दारं सताड उघडतो. आणि नवाचा ठोका पडताच पाठच्या दारातून वाऱ्याच्या दोन झुळुका आत आलेल्या आम्हाला जाणवतात—मधल्या खोलीत ठेवलेल्या खाण्याच्या पदार्थापाशी त्या काही क्षण रेंगाळतात—आम्ही तिन्ही पिढ्यांतली सहा माणसं तिथंच असतो—आम्हाला मायेनं कुरवाळल्यागत त्या झुळुका आमच्या अंगावरून फिरतात आणि पुढल्या दारातून निघून जातात!—घरोघरी हाच अनुभव येतो—" चंदरनं विलक्षण भावनाकुल आवाजात सांगितलं—

ते ऐकताना सर्वांच्या अंगावर काटा आला—

"बापरे!" टरबुज्या पुटपुटला, "तुम्हा लोकाचं ऐकावं ते नवलच!"

"खरं आहे!—आणि ह्या पितरांच्या स्वागतासाठी आम्ही ते जुने

पोषाक त्या दिवशी घालतो. आमच्याकडं प्रत्येक घरी ह्या जुन्या पोषाकांचे लहान मोठे चार जोड असतात! नव्या पिढीसाठी दोन! एक छोटा, दुसरा मोठा—एक आई, बापांचा, एक आजी, आजोबांचा—आणि हो खरं, ह्या अमावास्येदिवशी आमच्या पणजोबा आणि पणजीबाई ह्यांच्या-साठी आम्ही सोमरसाचे दोन पेले भरून ठेवतो—ती दोघे पुढल्या दारातून गेल्यावर तो सोमरस लहानथोर प्रसाद म्हणून पितात. आणि खाद्यपदार्थ घरातल्या माणसांनाच नव्हे, तर दारच्या गुरावासरांना, पाळीव कुत्र्या, मांजरांनाही देतात—

"म्हणजे तुमच्या इथे कुत्रे असतात?" आपल्या संशोधनाकडं—कुत्र्याशी बोलण्याच्या 'फोन'कडं अभिमानानं पाहत ज्ञानेशानं विचारलं.

"असतात तर!—तुम्ही अमावास्येदिवशी लक्ष्मीपूजन करता ना?" लगेच कवडया आणि कंपूकडं वळत चन्दर पुढं म्हणाला, "आम्ही प्रतिपदेदिवशी पहाटे ते करतो."

"सोन्याचे दागिने नसतात ना तुमच्याकडं?" ज्ञानेशानं प्रश्न केला.

"नाही. चांदीचे अलंकार असतात. आणि खूप किंमतवान अशा चंद्र-मण्याचे नाना अलंकार आमचे सराफ घडवितात. चन्द्रलोकी चंद्रमण्याच्या विपुल खाणी आहेत. ही रत्नं वेगवेगळ्या आकारांची आणि निळ्या रंगाच्या विविध छटांची असतात. त्यांचे हार, कर्णफुलं, केसात मुली आणि तरुण स्त्रिया घालतात. ते 'निकूर' अलंकार काकणं, अंगठ्या वगैरे छानदार दागिने असतात—" चंदर उत्तरला.

त्यानं आपला उजवा हातमोजा काढला आणि आपल्या अनामिकेतली चन्द्रमण्याची सुबक अंगठी काढून टेबलावर ठेवली.

सन्मित्र सुज्ञ होते—त्यांनी अंगठीला स्पर्श न करता दुरूनच ती पाहिली. निळ्या रंगाच्या विविध, फिरत्या छटा होत्या त्या चन्द्रमण्यात!

"वाहव्वा!" सराफाचा लेक शरच्चंद्र उद्गारला, "उत्कृष्ट हिऱ्या-पेक्षासुद्धा हे रत्न सुंदर आहे!—आणि अंगठीची बांधणी किती वेगळी

नि डौलदार आहे !—छान ! "

" हुं—तर असले आणि चांदीचे दागिने आम्ही ह्या पाडव्याच्या पहाटे पूजतो—" चंदरनं म्हटलं.

तसा टरबुज्या हसून बोलला, " ज्ञानेशा, आपल्याकडल्या सोन्याचे गोठ, पाटल्या वगैरे बटवटीत दागिन्यांपेक्षा असले चंद्रमण्याचे दागिने किती सुंदर दिसत असतील रे ! "

" फार काय आपल्या इथल्या श्रीमंतांच्या घरच्या हिऱ्यांच्या दागिन्यापेक्षासुद्धा चंद्रमण्याचे दागिने छान वाटतील ! हिरा म्हणजे तामस रत्न-अन हा चंद्रमणी—" चंदर परत बोटात चढवीत असलेल्या अंगठीचा निर्देश करीत कवड्यानं वाक्य पूर्ण केलं, " हा चन्द्रमणी सात्त्विक रत्न ! "

" भाऊबीजेदिवशी तुमच्या इथे बहिणी ओवाळतात काय भावांना ? " यमक्याने विचारले.

" अरे, अरे, यमक्या, काय हा प्रश्न ?—आपल्या इथं, परदेशी असलेला भाऊ भाऊबीजेला येऊ शकला नाही तर त्याची बहीण त्याच्या ऐवजी चंद्राला ओवाळते हे विसरलास ?— चंद्रलोकी भाऊबीजेची प्रथा असते हाच ह्या मागला अर्थ, गड्या ! " कवड्या उत्तरला.

" बरोबर ! " चंदर म्हणाला. " आमच्याकडं भाऊबीजेचा सण तुमच्यासारखाच साजरा होतो !—हा सणांचा नि सुट्टीचा महिना सरला की पावसाळ्यातला दीड महिना उरतो—कारण आमच्या इथं पावसाळा दोन महिनेच असतो. आणि पाऊस मोजका—म्हणजे शेतीला आणि नद्या तलावांना पाण्याचा पुरवठा होईल एवढाच—पडतो. "

" मग तुम्हाला रे—पावसाळी कोट लागत नसतील तर ? " तवश्या, परश्यानी जुळा प्रश्न केला—

" नाही, चार छत्र्या मात्र असतात हं !—तवश्या, हा प्रश्न तू आधी विचारायला सुरुवात केलीस—क्षणभरच आधी—तरीसुद्धा परश्यानं तुझ्या

'रे 'ची री ओढली !—तऱ्या, सवयीनं तू रेनकोट म्हणणार होतास ना ?—काय रे परश्या ? पण मघाचं घेडगुजरी बोलण्याबद्दलचं आख्यान आठवून तुम्ही दोघानी आगाऊ रंगीत तालीम केल्याप्रमाणं 'रे' गिळला आणि पावसाळी कोट उगाळला !—शाबास हं का ! " चंदरनं म्हटलं.

मग त्यानं आणखी काही सण सांगितले—

उन्हाळ्यातच चंद्रवासी 'होळी' करतात. आपल्या घरातलाच नव्हे, तर शेजाऱ्यांच्या घरातलासुद्धा कचरा, अडगळ मुलं काढतात. आणि सार्वजनिक होळ्यांमध्ये जाळून टाकतात !—मग दुसऱ्याच दिवशी रंग-पंचमीचा प्रकार होतो.

नद्यांच्या काठी जाऊन मुलं पिचकाऱ्यांनी एकमेकांच्या अंगावर नदीचं स्वच्छ पाणी उडवितात—रंगीबेरंगी पाण्यानं किंवा गुलालानं कोणाला माखत नाहीत. त्यांचे खेळसुद्धा सोज्वळ !—

हा खेळ पुरेसा झाल्यावर मुलं पाण्यात डुंबतात, पोहतात ! ह्या सणाच्या निमित्तानं मुलांच्या आणि मुलींच्या पोहण्याच्या वेगवेगळ्या स्पर्धा होतात. विजेत्या मुलामुलींना रौप्यचषक दिले जातात.

ह्या पोहण्याच्या स्पर्धेच्या अनुषंगानं चंदरनं तिथले इतर खेळ—मैदानी खेळ—सांगितले.

हुतुतू, आट्यापाट्या, क्रिकेट, फुटबॉल हे खेळ मुलांच्या परिचयाचे--

पण चन्दरनं एक अनोखा खेळ आता सांगितला. तो असा –

मैदानात एकमेकांपासून वीस फूट अंतरावर दोन खांब उभे करतात—त्या खांबांना एकाखाली एक वीतभर अंतर सोडून दोन दोऱ्या बांधतात. त्या दोन दोऱ्यांमध्ये सारख्या अंतरावर एक वीत व्यास असलेली चांदीची दहा चक्रं घट्ट बांधायची—मग प्रत्येक स्पर्धकाला मुसुंब्याच्या आकाराचे दहा चेंडू देण्यात येतात. त्या चक्रापासून दूर ठरलेल्या जागी एक जाड रेघ मारलेली असते.

ह्या रेघेवर उभं राहून स्पर्धकानं भरभर एकेक चेंडू ओळीनं एकेका

चक्रातून अलगद पलीकडं टाकायचा– जो जास्त चेंडू टाकील तो जिंकला—

वार्षिक परीक्षा संपल्या की ह्या सगळ्या खेळांच्या स्पर्धा होतात. पोहण्याच्या स्पर्धा त्या नियमाला अपवाद !—

" अरेच्चा ! रंगपंचमी दिवशीच्या पोहण्याच्या स्पर्धावरून मी आमच्याकडल्या खेळाबद्दल सांगत सुटलो—आता एकाच सणाबद्दल सांगायचं राहिलं आहे. ह्याच उन्हाळी–पावसाळी सुटीत पावसाची पहिली सर पडली की तुमच्या गणेशोत्सवासारखा आमच्याकडं चंद्रदेवोत्सव असतो ! प्रत्येक कुटुंबाच्या घरी चंद्रदेवाची हातभर उंचीची चांदीची मूर्ती असते. एखाद्या देखण्या पुरुषाची मूर्ती जणू !—ही मूर्ती पहिल्या पावसातून भिजत भिजत घरातील सर्व माणसं आपल्या घराजवळ असलेल्या नदीकाठी नेतात, तिथे ती नदीकाठी ठेऊन तिची पूजा करतात. घरोघरीच्या आठ हजार मूर्ती आमच्या दहा नद्यांच्या काठी हजर होतात. मग आमचे आधीच्या म्हणजे आईबाबांच्या पिढीतले जे पुरुष शिल्पकला शिकलेले असतात ते नदीकाठच्या मऊ शाडूसारख्या मातीची चंद्रदेवाएवढीच मूर्ती घडवितात. आणि दोन्ही मूर्ती घरोघरी परत नेतात. मग दुसऱ्या दिवशी सकाळी मातीच्या मूर्तीला चंदनाचे गंध, फुलं वाहून तिची पूजा करतात. आणि मिरवीत ती मूर्ती त्याच नदीकाठी नेऊन तिचे पाण्यात विसर्जन करतात—"

" म्हणजे आमच्या दीड दिवसाच्या गणपतीबाप्पासारखाच उत्सव हा " क्षितींद्र म्हणाला—

" होय ना ! " चंदर बोलला— " आता कवड्याच्या दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर !—आमचे उद्योगधंदे कोणते ?—धंदे शिक्षणाच्या कॉलेज घेतलेल्या शिक्षणाच्या आधारे चित्रकला, शिल्पकला, फोटोग्राफी, सुतारकाम, शिवणकला वगैरे धंदे जोरात चालतात, त्याखेरीज देशोदेशीची चित्रांची पुस्तकं बघून वाचून काही माणसं सराफीचा धंदा छान करतात.

काहीजण जिनगराचा धंदा अशाच सुरेख चालवितात—"

"जिनगराचा—अं—धनगर ऐकले आहेत..." ज्ञानेश पुटपुटला.

कवड्या मुद्दामच—इतर कोणी तरी फोड करावी ह्या उद्देशानं—हळूच हसत होता.

तसा चकल्या म्हणाला, "अध्यक्षा, अरे, जिनगर कापडाच्या, चिंध्यांच्या छानदार बाहुल्या बनवितात—"

"हं—हं !—आता आठवलं !—म्हणजे चंदर, चंद्रलोकीच्या मुली-सुद्धा बाहुल्यांनी खेळतात तर !" जणू आपण नवीन शोध लावल्याच्या ढंगात ज्ञानेश उत्तरला.

"होय ना :—आणि आमच्या आजीच्या, पणजीच्या बाळपणीच्या बाहुल्यासुद्धा आमच्याकडं जपून ठेवलेल्या असतात !—" चंदरनं पुढं म्हटलं, "थोडी शेती आणि कापसाची लागवड नि मच्छीमारी हे सुद्धा आमचे आवश्यक उद्योगधंदे आहेत !—बस्स !—कवड्या, झालं ना तुझं समाधान ?"

"झालं तर !" कवड्या म्हणाला.

लगेच ज्ञानेशानं घंटा वाजवली.

"कवड्या, आता मी आणि तू उरलोय. तू सांग तुझा विनोदी किस्सा त्यानं सांगितलं.

"उंहुं !—मी आपला लाष्टाकडून पहिला !— तुझी पाळी आधी होऊन जाऊ दे—" कवड्यानं म्हटलं.

तसा ज्ञानेशानं उगीचच घसा खाकरला. पण तो गप्प होता—तसा—

# अकरा

चकल्या म्हणाला, " आटप ज्ञानेशा, आता तुझी पाळी—"

" ही घे टाळी—" यमक्यानं साथ दिली.

ज्ञानेश नाही म्हटलं तरी जरा गडबडला होता. चंद्रलोकी कुत्रे असतात तेव्हा कुत्र्याशी बोलण्याच्या आपल्या फोनची चंदरला अपूर्वाई वाटेल—वाटायला हवी असं तो मारे स्वत:ला सांगत होता मघापासून—पण आता—

एवढ्यात टरबुज्या म्हणला, " ज्ञानेश, तुझा तो हाडकुळा फोन दाखव ना चंदरला. "

त्यावर चिडून ज्ञानेश बोलला, " हाडकुळा फोन ? "

" अरे, तो हाडापासून केलेला म्हणून टरबुज्यानं हाडकुळा म्हटलं असेल—एवढा काय उखडतोस, अध्यक्षा ? तू लक्ष देऊ नको त्याच्याकडं" कवड्यानं नेहमीप्रमाणं शिष्टाई केली.

ज्ञानेश आता ठिकाणी आला—चुकलंच आपलं ! आपल्या उच्च पदाचा आपल्याला असा विसर पडता नये !

" हुं—" ' फोन ' उचलून तोंडभर हसत त्यानं म्हटलं, " तर बरं का चंदर, आमच्या टिपू कुत्र्याशी बोलण्याचा ह्या अजब फोनचा मी शोध लावला आहे—बघा हं आता गम्मत—"

' फोन ' त्यानं कानाला लावला आणि बोलण्याच्या पोकळीतून तोंड नेत तो बोलला, " भुंक—भुंक—"

हाडकामामधून ' भुंक—भूंक ' असा आवाज स्पष्ट ऐकू आला.

आता ज्ञानेश पुढं बोलला, "मुं—भों—भो—भं—भं—"

आणि त्यानं विजयी मुद्रेने हाडूक टेबलावर ठेवलं—

मुलांनी कौतुकानं टाळ्या वाजविल्या—

मग मंद स्मित करीत चंदर म्हणाला, "ज्ञानेश, तुझा कुत्रा ॲल्सेशियन किंवा फॉक्स टेरियर ह्यापैकी नाहीये वाटतं—"

"अं—हे—तुम्ही—तू—कसं ओळखलंस?" ज्ञानेशानं गोंधळून विचारलं.

"आमच्या चंद्रलोकात आम्ही असले फोन सर्रास वापरतो. आणि तुम्ही बोललात त्या पद्धतीनं आम्ही फक्त गावठी कुत्र्याशी बोलतो. जातिवंत कुत्र्याशी बोलताना, तुमच्या नव्या व्याकरणानुसार अनुच्चारितच नव्हेत तर सर्वच अनुस्वार वर्ज्य असतात!—तुम्ही वापरलेले मुं—भों—भं—वगैरे चालत नाही—त्यावरून तुझ्या कुत्र्याची जात ओळखली मी—" चंदरनं सांगितलं—

हे ऐकून ज्ञानेश चांगलाच खट्टू झाला.

पण आपल्या हेकट स्वभावाला अनुसरून तो म्हणाला, "काय, सन्मित्रांनो, तुम्हाला नवल वाटलं ना ह्या 'फोन' वरलं माझं नि टिपूचं बोलणं ऐकून?"

सर्व दोस्तांनी होकार दिला.

एवढ्यात टरबुज्यानं म्हटलं, "होय बुवा, आम्हाला नवल वाटलं. पण ज्ञानेश, चंदरना विनोदाचे नमुने हवे आहेत म्हटलं! ह्या तुझ्या हाड—फोनमध्ये विनोद कुठं आहे?"

"तुला नसेल कळला तो—ऐक—" ज्ञानेश उत्तरला, "नवल वाटलं की, गम्मत वाटते. विनोद ऐकला तरी गम्मत वाटते. अर्थातच नवल म्हणजे विनोद!"

"अच्छा!" चकल्या बोलला, "म्हणजे—ज्याअर्थी 'अ बरोबर क' आणि 'ब बरोबर क' त्याअर्थी 'अ बरोबर क' असं बीजगणितातलं

समीकरण आहे तर हे ?"

"हं–हो–होय–" ज्ञानेशानं टप्प्या–टप्प्यानं होकार दिला.

"पण ज्ञानेशा," तवश्या म्हणाला, "नवल वाटलं आम्हाला! — चंदरना कुठं वाटलं? मग 'नवल बरोबर विनोद' हे समीकरण विनोदाचा नमुना म्हणून तू त्यांच्या गळी कसं उतरणार?"

"बरं, बरं–" ज्ञानेश फुणफुणला, "टरबुज्याचा शेजार वाघला वाटतं तुला?"

पोरगे मजेत हसले.

तशी जोरजोरानं घंटा वाजवीत ज्ञानेश ओरडला, "सायलन्स!"

पोरगे गप्प होताच जरा मवाळ स्वरात तो म्हणाला, "हे पाहा सन्मित्रांनो, माझ्या 'फोन'चा शोध आपल्या इथं तरी अपूर्व आहे! तेव्हा त्याचं मूल्यमापन चंदर काय ते करतील—अं—करील! तो त्याचा अधिकार! तुम्हाला कशाला हवीय ही उचापत?—चंदरला छान कळतं सगळं—"

"माझ्यापेक्षा ह्या यंत्राला कळतं. यंत्रानं नोंद केली, ती मी टिपतो आहे–" लिहिताना वर पाहून चंदरनं उत्तर दिलं.

ते ऐकून ज्ञानेश उगीचच गडबडला.

अन् उगीचच घंटी दाबीत तो म्हणाला, "कवड्या, तू!—लाष्ट!"

'लाष्ट' हा शब्द ज्ञानेशानं एवढ्या आवेशानं उच्चारला की, ह्या स्पर्धेतही कवड्याचा नंबर लाष्ट–लास्ट–सर्वांत खालचा–लागावा अशी शापवाणीच तो जणू उच्चारतो आहे!

कवड्याच्या सातही दोस्तांना हे आवडलं नाही.

कवड्या उभा राहताच त्यांनी टाळ्या वाजविल्या. आणि एकमतानं ते ओरडले, "कवड्या, जिते रहो, पठ्ठे!"

तसा कवड्या थोडं हसला. त्यानं घसा खाकरून गाण्यासाठी 'आ' कार लावतात तसा सूर लावला.

मग त्यानं गंभीरपणं म्हटलं, " चंदर आणि सन्मित्रांनो, मी आता तुम्हाला गद्य नाटकातलं एक पद म्हणून दाखविणार आहे—" आणि तो खाली बसला.

तसा चंदर प्रथमच मोठ्यांदा मनापासून हसला.

यमक्या, टरबुज्या हे दोघे त्याच क्षणी हसले.

उरलेले पाच सभासद क्षणभरानं हसले. त्यांची ट्यूब पेटायला एक क्षण अधिक लागला.

पण ज्ञानेशाची ट्यूब अजिबात पेटलीच नाही.

तो तिरतिरला, " हे रे काय, कवड्या ? पद न म्हणताच खाली काय बसलास ? "—हे ऐकताच सगळे आणखीच जोरानं हसले.

तसं हसू दाबीत टरबुज्यानं विचारलं, " ज्ञानेशा, गद्य नाटक म्हणजे काय हे ठाऊक तरी आहे काय तुला ? "

" आहे बरं ! ज्यात पद नसतं ते गद्य नाटक ! " ज्ञानेश ऐटीत उत्तरला.

सन्मित्रांना पुन: हसू फुटलं.

" होय ना ?—मग तसल्या नाटकातलं पद कसं म्हणणार कवड्या ? " टरबुज्यानं परत विचारलं.

" मग कवड्यानं तसं कां सांगितलं ? " ज्ञानेशाचा मख्ख सवाल.

" हात्तिच्या ! अरे लेका, तोच तर विनोद ! " टरबुज्यानं फोड केली.

" हुंः !—तुम्ही खूप म्हणाल ! पण चंदरला ते पटायला हवं ना ?— काय हो, चंदर ? " मुद्दाम बहुवचनाचा मान देत ज्ञानेशानं मोठ्या आशेनं प्रश्न केला.

पण—हाय !—चंदर हसून बोलला, " माझ्या यंत्रानं विनोदाचा उच्चांक दाखविला आहे आणि ' मस्त विनोद ' असा शेराही दिला आहे, ज्ञानेश!"

" आणि आम्ही एक मुद्दा हातचा धरला—की, कवड्याच्या विनोदानं चंदर प्रथमच खळखळून हसला ! " यमक्या म्हणाला.

" अगदी बरोबर ! " चंदर उद्गारला.

वाईट तोंडानं हसण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत ज्ञानेशानं म्हटलं " समजलं !–हं—तर, सन्मित्रांनो. लक्षात ठेवा बरं !—लाष्ट नंबर पसंत करणारा कवड्या पहिला आला—आणि मी पहिला असा मी—मीपणा करणारा यमक्या पडला ! "

" मित्रांबरोबर—विशेषतः, अध्यक्षाबरोबर पडण्यात खेद कसला ? " हजरजबावी यमक्याचा जबाब हजर ! "

" ज्ञानेशा, हे गैर आहे हं. स्वतः पहिला न आल्याचा राग तू उगीचच यमक्यावर काढतो आहेस ! चंदर काय म्हणेल हे ऐकून ? आणि मुख्य म्हणजे, चंदरनं त्याचा टेप रेकॉर्डर चंद्रलोकी वाजवून दाखविला की, तिथल्या लोकांना काय वाटेल ? " चकल्यानं कानपिचकी दिली.

आता ज्ञानेश गडबडला. तो चंदरजवळ थोडे झुकत पुटपुटला,

" छे: छे: !—मी आपला तो सार्वजनिक नियम सांगितला, चंदर--"

" आलं लक्षात, ज्ञानेश—" चंदर हसून उत्तरला.

कवड्याचा विनोद ऐकताच खळखळून हसल्यापासून चंदरचं इथं आल्यापासूनच मोजकं स्मित नाहीसं झालं होतं. इतर सन्मित्रांप्रमाणे बारीक सारीक गमती-जमतीमुळे सुद्धा तो हसत होता.

त्यानं खिशातून एक चांदीचे पदक काढलं.

मग ते पुढं-करीत तो म्हणाला, " हं–कविराज–उहुं—कवड्या; हे घे तुला प्रथमांकाचं चंद्रलोकीचे रौप्य पदक–"

कवड्यानं ओंजळ पुढे करीत म्हटलं, " दे ते चंदर—"

आपल्या स्वभावानुसार संपूर्ण वैतागत ज्ञानेश चिरचिरला, " शीः ! भिक्षा घेतल्यागत ओंजळीत पदक काय घेतो रे कवड्या ? "

" कारण कवड्या सुज्ञ आहे, शहाणा आहे !—आणि खरं म्हणजे, त्याचं हे शहाणपण सर्वांआधी तुला जाणवायला हवं होतं, ज्ञानेशा—" टरबुज्या उत्तरला.

" ते का ? " ज्ञानेशानं विचारलं.

" म्हटलं, अध्यक्षराव, " पुढच्यास ठेच, मागचा शहाणा ! '—कसं मंडळी ? " टरबुज्या म्हणाला.

मंडळींनी एकमेकाला टाळी देत हास्याची खसखस पिकवली.

आत्ता ज्ञानेशाला उमज पडला. त्यानं दोन कोरडे आवंढे गिळले.

चंदरनं खिशातून रुपेरी कागद काढले नि ते टेबलावर ठेवले.

मग तो बोलला, " सन्मित्रांनो, ही तुम्हा नऊ जणांसाठी नऊ प्रशस्ति-पत्रकं आहेत ! सर्वांनीच कमी, अधिक प्रमाणात विनोदाचे नमुने सादर केले त्याबद्दल सर्वांनाच चंद्रलोकाच्या वतीनं आभाराची ही पावती !—दोस्तहो, माझा वेळ छान गेला—विनोदाचे नमुने मिळविण्याचं माझं काम अपेक्षेबाहेर सफल झालं ! तुम्हा सर्वांशी माझी मैत्री जमली—कवड्याशी जन्मांतरीचं नातं जुळलं !—तुम्हा सर्वांना चंद्रलोकात येण्याचं आमंत्रण मी दिलंच आहे. आता मी तुमचा साभार निरोप घेतो—मघा आल्यावेळी मी तुमच्या पद्धतीनं नमस्कार दिला; घेतला—आता चंद्रलोकीच्या आमच्या पद्धतीनं मी अभिवादन करतो हं—"

आणि चन्दरनं उजवा पंजा छातीला आडवा लावून मान तुकवीत रुबाबदार अभिवादन केलं.

साहजिकच सगळ्या सन्मित्रांना तसं अभिवादन करून पाहण्याचा मोह पडला—आणि आपलं हे अभिवादन कसं दिसतंय हे नजर खाली करून बघण्यात सगळे गढले असताना चन्दर केव्हा सटकला हे कोणालाच कळलं नाही. हाच उद्देश होता चंदरचा !—

सर्वांत आधी कवड्याला ते जाणवलं आणि तो धावत फाटकाच्या बाहेर गेला—हेसुद्धा इतराच्या लक्षात आलं नाही.

मिनिटभरानं सन्मित्रांना चंदर गेला हे उमगलं.

टरबुज्यानं आवाज दिला, " बोला—चंदरकी जय ! "

सगळे ओरडले, " चंदरकी जय : "

मग टरबुज्यानं दुसरी घोषणा दिली, " बोला—कवड्याकी जय ! "

" शी ! " ज्ञानेश तटकन म्हणाला, " पहिली घोषणा कशी सुबक वाटली ! ही—ही—' कवड्याकी जय ' बेढब वाटते ! "

लगेच टरबुज्याची तिसरी घोषणा तयार—" बेढब की जय ! ज्ञानेश की जय ! "

" म्हणजे—म्हणजे—मी बेढब ? तरी बरं, तूच टरबुजासारखा गरगरीत आहेस, टरबुज्या ! " ज्ञानेश फुणफुणला.

तसा चकल्या उत्तरला; " मघाचे समीकरण स्मरणे—"

" सुज्ञांस न लगे अधिक सांगणे—" यमक्यानं काव्यपूर्ती केली—

शरच्चंद्र ओरडला, " पुंडलीक वरदा हरी विठ्ठल ! "

कवड्याखेरीज सात सभासदांनी साथ दिली—" श्री ज्ञानदेव तुकाराम ! "

आणि कवड्या—

तो पार पाठच्या मोकळ्या माळावर येऊन पोचला होता. पण तिथं—चंदरच्या चंद्रयानाची काहीच नावनिशाणी नव्हती. असणार कशी ?—इथल्या लोकांना ते दिसू शकणार नव्हतं ना ?—

कवड्या उगीचच वरती आकाशात बघत उभा होता. त्यानं एक अस्फुट सुस्कारा सोडला.

त्याच्या मनात आलं, चंदर जिथून आला तिथं गेला !—

हंऽ !–' जेथुनी आला तिथेच गेला । लोभ आपुला व्यर्थचि ठरला ।। '

" छे छे ! चुकलं—चुकलं हं, चंदर—' लोभ आपुला सार्थचि झाला ।।

खरंच सार्थ झाला !—दीड दोन तासांच्या अवधीत चंदर, तू मला केवढा जिव्हाळा लावलास—त्याचमुळे तू अचानक दिसेनासा होताच माझ्या जिवाला एवढा चटका लागला !—

आणि कवड्यानं सहज वरती पाहयलं.

उंच, निळ्या अवकाशात त्याला रुपेरी धूसर रेषा दिसल्याचा भास झाला.

" ओह ! हेच चंदरचे चंद्रयान असणार ! "

अन आपल्याला देव दिसत नसला तरी देवाला आपण दिसतो ह्या श्रद्धेनं नमस्कार करावा, तसा कवड्यानं त्या रेषेकडं बघत हात जोडून नमस्कार केला.

आपला हा निरोपाचा नमस्कार चंदरला नक्की दिसणार, त्याला तो नक्की पोचणार—हंऽ !—

आणि डोळ्यात दाटणाऱ्या अश्रूमुळं चुरचुरणारे डोळे प्रयत्नपूर्वक सताड उघडीत तो पुटपुटला, " चंदर पुन्हा भेटू या हं आपण नक्की भेटू या. "

अन टपकन गालावरून ओघळणारे दोन आसू शर्टाच्या बाहीनं पुसत कवड्या थोडंसं हसला हो !— नाहीतर चन्दरलाही वाईट वाटेल.

कुठल्या तरी जन्मीचा आपला जुळा भाऊ ना तो—

आता ह्या आठवणीसरशी कवड्या मनापासून हसला.

आणि आकाशात कुठं काहीच दिसत नसूनही हात हलवून त्यानं चंदरला निरोप दिला. नि जड पाउलांनी तो आत जाण्यासाठी वळला.

१५८८ ३१५१४
BVBK-0401588